cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–७० | गुरूवार दि.२० जून २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये

### संपादकीय

## ‘जी–७’ चे फलीत शुन्य !

इटलीत नुकतीच पार पडलेली ‘जी–७’ या बड्या राष्ट्रांच्या गटाची परिषद व त्यात ‘मागच्या पानावरून’ पुढे या पद्धतीने झालेले ठराव पाहता या परिषदेचे फलित काय? असा प्रश्न जगाला पडला असल्यास नवल ते काय? रशिया–युक्रेन यांच्यात सुरू असलेल्या दिर्घकाळाच्या युद्धाने जग वेठीस धरले गेलेले असताना त्यात इस्त्रायल–हमास संघर्षाची भर पडली असल्याने जगातील गरीब व विकसनशील देशांच्या अर्थव्यवस्थांसमोर मोठी संकटे निर्माण झाली आहेत. एवढेच नव्हे तर विकसित देशांच्या अर्थव्यवस्थाही अडचणीत सापडल्या आहेत.

## काँग्रेस नेते राहुल गांधींना नेत्यांसह कार्यकर्त्यांनी दिल्या वाढदिवसाच्या शुभेच्छा

नवी दिल्ली : काँग्रेसचे दिग्गज नेते खासदार राहुल गांधी यांचा बुधवार दि. १९ जून रोजी ५४ वा वाढदिवस होता. राहुल गांधींसाठी हा वाढदिवस खूप खास आहे. याचे कारण लोकसभा निवडणुकीत पक्षाची चांगली कामगिरी आहे. यामुळे राहुल गांधींची प्रतिमा बदलली असून केवळ पक्षातच नाही तर भारतीय राजकारणातही राहुल गांधींचा दबदबा वाढला आहे. त्यामुळे राहुल गांधींसाठी हा वाढदिवस खूप खास आहे. सुत्रांच्या मते, यावेळी राहुल गांधी लोकसभेतील विरोधी पक्षनेतेही होऊ शकतात. राहुल यांच्या ‘भारत जोडो’ यात्रेमुळे देशात परिवर्तनाची लाट सुरू झाली असून, यामुळे काँग्रेस पक्षाला लोकसभा निवडणुकीत चांगले यश मिळाले. यामुळे काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये उत्साह निर्माण झाला आहे.

# एमएसपी कायद्याची त्वरित अंमलबजावणी करा

## » शेतकरी नेते राकेश टिकैत यांचा पुन्हा मोठ्या आंदोलनाचा इशारा

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**केंद्र सरकार शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर उदासीन असून त्यावर मात करण्यासाठी एक मजबूत संघटनेची गरज असल्याचे टिकैत यांनी म्हटले आहे. तर यावेळी महापंचायत मेळाव्यात २६ ठराव पारित करत १०० दिवसांचा अजेंडा ठरविण्यात आल्याची माहिती टिकैत यांनी दिली. टिकैत यांनी एमएसपी कायद्याचे महत्त्व अधोरेखित करताना शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी सरकारला त्वरित कायद्याची अंमलबजावणी करण्याचे आवाहन केले. केंद्र सरकारला त्यांच्या जाहीरनाम्याच्या आश्वासनांची आणि तीन कृषी विधेयके मागे घेण्याची आठवण करून दिली. मजबूत भूसंपादन कायदा आणि आदिवासी शेतकऱ्यांच्या संरक्षणावर टिकैत यांनी भर दिला.**



दिल्लीच्या सीमांवर हरियाणा आणि पंजाबच्या शेतकऱ्यांकडून आंदोलन सुरूच आहे. त्यावरून भारतीय किसान युनियनचे राष्ट्रीय प्रवक्ते राकेश टिकैत यांनी केंद्र आणि राज्य सरकारला इशारा देताना निशाना साधला. टिकैत यांनी, शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे सरकारने लक्ष न दिल्यास कावड यात्रेनंतर मोठे आंदोलन छेडू, असा इशारा दिला आहे. तसेच शेतकऱ्यांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी संयुक्त आघाडीचे समर्थन करत २०२५ पर्यंत २५ किसान भवन बांधण्याचे लक्ष्य असल्याचेही टिकैत यांनी म्हटले आहे. ते हरिद्वार येथे आयोजित चार दिवसीय किसान कुंभच्या समारोपप्रसंगी आयोजित महापंचायत मेळाव्यात बोलत होते. मेळाव्यात २६ ठरावात स्वतंत्र शेतकरी आयोग स्थापन करणे, शेतकऱ्यांना मोफत वीज देणे, भटक्या जनावरांची समस्या सोडवणे आणि अल्प भूधारक शेतकऱ्यांना बिनव्याजी कर्ज देणे या प्रमुख प्रस्तावांचा समावेश आहे. महापंचायतीने पाणी व्यवस्था आणि ग्रामीण पायाभूत सुविधांचे महत्त्वही अधोरेखित केले. तरुणांच्या प्रश्नांवर बोलताना अग्निवीर योजना रद्द करण्याची मागणी केली. तसेच सध्या कार्यरत असणाऱ्या योजनेतील तरूणांना सरकारने इतर सुरक्षा दलांमध्ये घेऊन त्यांना बेरोजगार भत्ता द्यावा, अशीही मागणी टिकैत यांनी केली. ◄◄ पान २ वर

### केजरीवालांच्या न्यायालयीन कोठडीत ३ जुलैपर्यंत वाढ

नवी दिल्ली: दिल्ली मद्य धोरण घोटाळा प्रकरणी तिहार तुरुंगात असलेले दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल तसेच विनोद चौहान यांच्या न्यायालयीन कोठडीत राऊस अव्हेन्यू न्यायालयाने ३ जुलैपर्यंत वाढ केली आहे. न्यायालयीन कोठडीची मुदत संपल्यानंतर दोघांनाही तिहार तुरुंगातून व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे न्यायालयात हजर करण्यात आले होते. सक्तवसुली संचालनालयाने बुधवारी न्यायालयाला केजरीवाल यांच्या न्यायालयीन कोठडीत वाढ करण्याची विनंती केली. कारण दिल्ली मद्य धोरणातील कथित घोटाळ्याच्या तपासासाठी हे महत्त्वाचे आहे. ईडीच्या वकिलांनी न्यायालयात दावा केला की विनोद चौहान यांनी गोव्यातील निवडणुकीसाठी अभिषेक बोईनपल्ली यांच्यामार्फत बीआरएस नेत्या के. कविता यांच्या स्वीय सहाय्यकाकडून २५ कोटी रुपये घेतले. तसेच या महिन्याच्या अखेरीस विनोद चौहान यांच्या विरोधात फिर्याद दाखल करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. त्यांना मे महिन्यात अटक करण्यात आली होती.

### महाराष्ट्रात जुलैमध्ये भाजपची धन्यवाद यात्रा - बावनकुळे

नागपूर: लोकसभा निवडणुकीत मतदारांनी दिलेल्या पाठबळाबद्दल धन्यवाद व्यक्त करण्यासाठी महाराष्ट्रात भाजप धन्यवाद यात्रा काढणार आहे. सर्व आमदार–खासदार, संघटनेतील सर्व पदाधिकारी यात सहभागी होतील. ज्या मतदारांकडे आम्ही मत मागण्यासाठी जाऊ त्यांच्यापर्यंत मोदी सरकारच्या नवीन योजना देखील पोहचवणार आहोत, असे माध्यमांशी बोलताना भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

# आरक्षण अन् निवडणुकीवरुन हाके-जरांगेमध्ये जुंपली!



**बीड । प्रतिनिधी**

**मराठा आरक्षण हे ओबीसीतून आणि सगेसोयरेची अमलबजावणी करण्यासाठी मनोज जरांगे यांचे अंतरवली सराटीत तर ओबीसी आरक्षणाला धक्का लागू नये म्हणून ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांचे गेल्या सात दिवसापासून वडीगोद्रीत अमरण उपोषण सुरु आहे. एकीकडे मनोज जरांगे यांनी पहिल्या टप्यात राज्यातील १२७ विधानसभा मतदार संघांचे सर्व्हे पुर्ण झाले असून वेळ आली तर मराठा, मुस्लिम, दलित आणि लिंगायत समाजाची मोट बांधून निवडणुकीत उतरणार असल्याचे जरांगे पाटलांनी जाहीर केले तर दुसरीकडे मनोज जरांगे हा भंपक माणूस आहे, अशी बोचरी टिका लक्ष्मण हाके यांनी केली आहे. त्यामुळे आरक्षणावरुन जरांगे आणि हाके यांच्यात चांगलीच जुंपली असल्याचे चित्र आहे.**



## मनोज जरांगे हा भंपक माणूस

### निवडणुकीच्या मुद्दयावरुन लक्ष्मण हाके यांची बोचरी टीका

**मुंबई : मनोज जरांगे हा भंपक माणूस असल्याची बोचरी टिका ओबीसी आंदोलनकर्ते लक्ष्मण हाके यांनी जरांगे पाटलांवर निवडणुकीच्या मुद्दावर केली आहे. आंदोलनावर भाष्य करताना, सरकारला परिस्थिती माहिती आहे, कायदा व सुव्यवस्था पाळणे ही सरकारची जबाबदारी आहे. मी सर्वांना शाततेचे आवाहन करतोय, जनतेपर्यंत आवाज पोहोचतोय पण सरकारपर्यंत आवाज पोहोचत नाही का, असा सवाल लक्ष्मण हाकेंनी विचारला आहे.**

यावेळी पुढे बोलताना लक्ष्मण हाके म्हणाले, कुणबी आणि मराठा हे वेगळे आहेत. लिटरेचर बघितले, बॅक हिस्ट्री बघितली, स्वरुप बघितले, त्यांचे सोयरीक बघतली, त्यांचे देव–देवाक बघितले, आचार–विचार बघितले, रोटी–बेटी व्यवहार बघितले, तर कुणी आणि मराठा वेगळे आहेत. सुशीलकुमार शिंदे मुख्यमंत्री असताना २००४ साली जो शासन निर्णय झाला, त्या जीआरने महाराष्ट्रातील ओबीसींचे आरक्षण संपुष्टात आणले आहे, असेही हाके यांनी म्हटले. मनोज जरांगे यांच्या विधानसभा निवडणुकीच्या वक्तव्याचा समाचार ◄◄ पान २ वर

#### ‘‘ आमचाही १९९ मतदारसंघात सर्व्हे पूर्ण–प्रकाश शेंडगे

प्रकाश शेंडगे म्हणाले की, जरांगे जर उमेदवार उभे करणार असतील तर ओबीसी उमेदवारही उभा राहतील, आमचं बहुमत आहे. ६० टक्के जाती या ओबीसी आहेत. दलित आणि मुस्लिमांना सोबत घेतलं तर आम्ही ८० टक्के जातो. आमचेही १९९ मतदारसंघात सर्व्हे पूर्ण झाले असून आम्हीही तशीच भूमिका घेऊ शकतो, असे ओबीसी नेते प्रकाश शेंडगे यांनी जाहीर केले.

#### ‘‘ बीड जिल्ह्यात ठिकठिकाणी रास्ता रोको

ओबीसी आरक्षण बचाव आंदोलनाच्या पार्श्वभुमीवर बीड जिल्ह्यातही ठिकठिकाणी ओबीसी समाज बांधवांनी रस्तारोको आंदोलन केले. तसेच पाटोदा तालुक्यातून ५०० गाड्यांचा ताफा वडीगोद्रीला पाठींबा देण्यासाठी दाखल झाला.

## विधानसभा निवडणूक लढवणार, १२७ जागांचा सर्व्हे पूर्ण!

### मराठा, मुस्लिम, दलित, लिंगायतांची मोट बांधणार–मनोज जरांगे

**छत्रपती संभाजीनगर : सरकारने आरक्षण दिले नाही तर मराठा आंदोलक मनोज जरांगे विधानसभा निवडणूक लढवण्याच्या तयारीत आहेत. त्यासाठी त्यांनी १२७ जागांवर पहिला सर्व्हेदेखील केला आहे. खुद्द जरांगे यांनी बोलताना ही घोषणा केली आहे. मात्र ते स्वतः निवडणूक लढवणार नाहीत.. स्वतःचा पक्ष काढून उमेदवार उभे करायचे की अपक्ष म्हणून उभे करायचे हे अजून ठरलेले नाही. वेळ आली तर मराठा, मुस्लिम आणि दलित, लिंगायत यांची मोट बांधून निवडणूक लढवणार असेही मनोज जरांगे यांनी सांगितले आहे.**

◄◄ पान २ वर

#### ‘‘ मी स्वतः निवडणूक लढवणार नाही : मनोज जरांगे

सरकारने आरक्षण दिल नाही तर जरांगे विधानसभा निवडणुकीत लढवणार आहे. १२७ मतदारसंघात पहिला सर्व्हे केला आहे. इतर मतदारसंघात आणखी दुसरा सर्व्हे करणार आहे. आरक्षण नाही दिले तर वेळ आली तर जरांगे मराठा, मुस्लिम आणि दलित, लिंगायत यांची मोट बांधून निवडणूक लढवणार आहे. मी स्वतः निवडणूक लढवणार नाही. स्वतःचा पक्ष की अपक्ष हे अजून ठरवले नाही. मी सर्व मतदारसंघात जाणार आहे, असे मनोज जरांगे म्हणाले.

#### ‘‘ प्रत्येक जिल्ह्यात शांतता जनजागृती रॅली काढणार

६ जुलैपासून मराठवड्यात प्रत्येक जिल्ह्यात शांतता जनजागृती रॅली काढण्यात येणार आहे. ६ जुलै हिंगोली, ७ जुलै परभणी, ८ जुलै नांदेड, ९ जुलै लातूर, १० जुलै धाराशिव, ११ जुलै बीड १२ जुलै जालना, १३ जुलै संभाजीनगर जिल्ह्यात रॅली असणार आहे.

# फडणवीराज संपणार; भाजपात कोअर कमेटी निर्णय घेणार

### हायकमांडचा आदेश; ज्येष्ठ नेत्यांना जबाबदारी देऊन सक्रीय करा



मुंबई । प्रतिनिधी

भाजपला लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात चांगले यश मिळाले नाही. यानंतर भाजपच्या गोटात निकाल जाहीर झाल्याच्या पहिल्या दिवसापासून चलबिचल सुरु आहे. गेल्या १० वर्षातील राज्य भाजपातील फडणवीसराज आता संपणार असल्याचे संकेत असून यापुढे कोअर कमेटी राज्यातील भाजपचे निर्णय घेणार आहे. तर जेष्ठ नेत्यांना जबाबदारी देऊन त्यांना सक्रीय करण्याचे आदेश भाजप हायकमांडने दिले आहेत. त्यामुळे एकनाथ खडसे, पंकजा मुंडे, विनोद तावडे, प्रकाश जावडेकर, माधव भंडारी यांच्यासारख्या जेष्ठ नेत्यांना भाजपात चांगले दिवस येणार असल्याचे दिसते.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि भाजपचे केंद्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी भाजपच्या कोअर कमिटीची बैठक पार पडली. संघटनमंत्री बीएल ◄◄ पान २ वर

#### हायकमांडच्या महाराष्ट्र भाजपला महत्त्वाच्या सूचना

महाराष्ट्रात एकट्याच्या मर्जीने निर्णय होणार नाहीत, तर सामूहिक निर्णय व्हावेत, अशी सूचना पक्षश्रेष्ठींनी दिली. कोअर कमिटीला सोबत घेऊनच निर्णय घ्यावा आणि पक्ष चालवावा लागणार. कोणत्याही एका नेतृत्वावर भाजप अवलंबून राहणार नाही. एकत्रितपणे काम करायला हवे. भाजपच्या सर्व जुन्या नेत्यांना सक्रिय करायला हवे. आत्तापासूनच उमेदवारांना तयारीच्या सूचना द्या. लोकसभा निवडणुकीत ज्या चुका झाल्या त्या विधानसभा निवडणुकांमध्ये पुन्हा होऊ देऊ नका. सोशल मीडियाचा अधिक वापर करा आणि विरोधकांना प्रत्युत्तर द्या, अशा सूचना भाजपच्या हायकमांडने महाराष्ट्रातील भाजप नेत्यांना दिल्या.

#### दिल्लीतल्या बैठकीत नेमकं काय ठरलं?

या बैठकीनंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री पीयूष गोयल हे माध्यमांसमोर आले होते. त्यांनी बैठकीत लोकसभेच्या निकालावर सविस्तर चर्चा करण्यात आल्याची माहिती दिली. तसेच विधानसभेसाठी रोडमॅप ठरवण्यात आल्याची माहिती दिली.

## शिवसेना फोडणाऱ्या नालायकांसोबत परत जाणार नाही – उद्धव ठाकरे

**मुंबई । प्रतिनिधी**

**निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर उद्धव ठाकरे आता भाजसोबत चर्चा करत असल्याच्या अफवा पसरवल्या गेल्या, पण ज्यांनी आपल्या मातेसमान शिवसेना फोडली त्यांच्यासोबत जायचे का? आता त्यांची फाटलीय म्हणून या चर्चा सुरू केल्या असल्याचा घणाघात उद्धव ठाकरे यांनी केला. शिवसेनेचे नाव आणि धनुष्यबाण चिन्ह सोडून माझ्यासमोर या, मग सांगतो यांना असे आव्हानही त्यांनी एकनाथ शिंदे यांना लगावला. शिवसेनेच्या वर्धापन दिनानिमित्त उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचा मेळावा मुंबईतील षण्मुखानंद सभागृहात पार पडला. यावेळी ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी भाजप आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंसह विरोधकांवर जोरदार हल्लाबोल केला.**



जमलेल्या माझ्या लढावाय्या शिवसैनिकांनो! लोकसभा निवडणुकीच्या निकलानंतर पहिला आपला जाहीर कार्यक्रम आहे. शिवसेना म्हटल्यावर नवे चैतन्य आणि तरुणाई आली पाहिजे. मविआची पत्रकार परिषद झाली, त्यावेळी मी धन्यवाद दिले आहे. पण पुन्हा एकदा शिवसेनेच्यावतीने सर्व हिंदू, मुस्लिम, शीख, बौद्ध या सगळ्या धर्मांचे साथ दिल्याबद्दल आभार मानतो. गेल्या आठवड्यात मविआची पत्रकार परिषद झाली. त्यावेळी मी सर्वांना धन्यवाद दिले. पण मी पुन्हा एकदा शिवसेनेच्या वतीने सर्व देशभक्त ज्यामध्ये हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन, बौद्ध, दलित या सर्वांना, मविआला मतदान करणाऱ्या सर्व देशभक्तांना मी धन्यवाद देतो. मी शून्य आहे, यशाचे धनी तुम्ही आहात. आत्मविश्वास असेल तर जगाच्या कोपऱ्यात कुठेही जा तुम्हाला कोणी रोखू शकत नाही. पण आत्मविश्वास आणि अहंकार यामध्ये फरक आहे. अहंकार जो मोदींमध्ये आहे. आता पुन्हा एकदा चर्चा ◄◄ पान २ वर

### बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१९ जून २०२४**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
| --- | --- | --- | --- |
| गहू : १०.०० क्विंटल | २,३३५ | २,७०० | २,४१६ |
| ज्वारी/हायब्रिड :४२.०० क्विंटल | १,९६० | २,८०० | २,२९० |
| मूग : १.०० क्विंटल | ७,२७६ | ७,५०१ | ७,३८८ |
| तूर : १.५० क्विंटल | ४,१०० | ६,००० | ५,२६७ |
| उडीद : ९.५० क्विंटल | २,३३२ | २,६०० | २,४४४ |
| बाजरी: २.०० क्विंटल | २,३५० | २,६५० | २,५०० |
| चिंच/लोकल: ४७.०० क्विंटल | १,७०० | ६,३०० | ४,००० |
| सोयाबीन: १४५.५० क्विंटल | ४,३२५ | ४,४५१ | ४,४०८ |
| हरभरा: ३.०० क्विंटल | ४,५०० | ६,४३५ | ५,४६७ |


# महाराष्ट्रात जुलैपासून सर्वांना मिळणार ५ लाखांपर्यंत आरोग्य विमा

## ९०० रुग्णालये नव्याने जोडणार

**मुंबई । प्रतिनिधी**

**महाराष्ट्रात लवकरच सर्व नागरिकांसाठी आरोग्य विम्याचा फायदा घेता येणार आहे. महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत इन्शुरन्स कंपनीची निवड करण्यात आली आहे. सरकारकडून निर्णय देण्यात आल्यानंतर त्याची अंमलबजावणी केली जाईल. या विमा योजनेमुळे राज्यातील जनतेला मोठा दिलासा मिळणार आहे.**

योजनेद्वारे आतापर्यंत १.५ लाख रुपयांचा विमा दिला जात होता, पण हा विमा वार्षिक उत्पन्न १ लाख रुपयांपेक्षा कमी असलेल्या लोकांसाठी उपलब्ध होता. त्यामुळे अनेकांना या विम्याचा लाभ घेता येत नव्हता. आता मात्र या विम्याच्या योजनेसाठी उत्पन्नाची मर्यादा असणार नसून, सर्वांना याचा लाभ घेता येणार आहे. या योजनेअंतर्गत सरकार विमा कंपनीला प्रत्येक कुटुंबासाठी १३०० रुपये प्रीमियम भरणार आहे. यासाठी सरकारी तिजोरीतून तीन हजार कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत. या योजनेअंतर्गत आणखी ९०० रुग्णालये नव्याने जोडली जाणार असून एकूण १९०० रुग्णालये आता महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत उपचार



देतील. महाराष्ट्रातील जनतेला उत्तम आरोग्यासह चांगल्या सुविधा, तसेच आर्थिकदृष्ट्या परवडण्यासाठी सरकारचे विमा योजना सुरू करण्याचे उद्दिष्ट आहे. मागील वर्षी जूनमध्ये उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विमा रक्कम दीड लाखावरून ५ लाख रुपये करण्याची घोषणा केली होती. मात्र त्याची अंमलबजावणी करण्यात आली नव्हती. महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेच्या अधिकाऱ्यांनीही ५ लाखांचा विमा लागू करण्याचे ◄◄ पान २ वर

cmyk

अग्रलेख

# ‘जी-७’ चे फलीत शुन्य !

इटलीत नुकतीच पार पडलेली ‘जी-७’ या बड्या राष्ट्रांच्या गटाची परिषद व त्यात ‘मागच्या पानावरून’ पुढे या पद्धतीने झालेले ठराव पाहता या परिषदेचे फलित काय? असा प्रश्न जगाला पडला असल्यास नवल ते काय? रशिया-युक्रेन यांच्यात सुरू असलेल्या दिर्घकाळाच्या युद्धाने जग वेठीस धरले गेलेले असताना त्यात इस्रायल-हमास संघर्षाची भर पडली असल्याने जगातील गरीब व विकसनशील देशांच्या अर्थव्यवस्थांसमोर मोठी संकटे निर्माण झाली आहेत. एवढेच नव्हे तर विकसित देशांच्या अर्थव्यवस्थाही अडचणीत सापडल्या आहेत. जागतिक पुरवठा साखळी विस्कळीत झालेली आहे आणि या संघर्षामुळे मोठी जीवित व वित्तहानीही होते आहे. त्याचा विपरीत परिणाम जागतिक अर्थव्यवस्था व जागतिक शांतता या दोहोंवर होतो आहे. अशावेळी जगातील विकसित व बडी राष्ट्रे म्हणून जगाचे पुढारपण करणाऱ्या राष्ट्रांच्या गटाने पुढारपणासोबतच आपल्यावर येणारी जबाबदारी लक्षात घेऊन या परिषदेत काही ठोस व कृतिशील निर्णय घ्यायला हवे होते. मात्र, तसे काही घडल्याचे जाणवत नाही. उलट हे संघर्ष निर्माण होण्यामागे प्रमुख कारण असलेल्या भूमिकांचाच पुनरुच्चार या परिषदेत झाला. त्यामुळे मग ही कोंडी फुटणार तरी कशी? असाच प्रश्न सध्या उपस्थित झाला आहे.

‘जी-७’ च्या यंदाच्या परिषदेला यजमान इटलीने भारतासह बारा देशांना खास निमंत्रित केले होते. भारत ‘ग्लोबल साऊथ’ची संकल्पना सातत्याने जागतिक व्यासपीठावर मांडतो आहे. भारतासह बारा देशांना ‘जी-७’ परिषदेसाठी मिळालेले निमंत्रण हे भारताने मांडलेली संकल्पना बड्या राष्ट्रांकडून स्वीकारली जात असल्याचेच द्योतक आहे व गरीब आणि विकसनशील देशांसाठी हे शुभसंकेतच आहेत. रशियाने युक्रेनवर युद्ध लादले असल्याने रशियाची दादागिरी मोडून काढण्यासाठी रशियाची आणखी कोंडी करण्याचा ठराव या परिषदेत झाला व त्याचबरोबर युद्धामुळे उद्ध्वस्त झालेल्या युक्रेनला ५० अब्ज डॉलर्सची मदत करण्याचा निर्णय झाला. ही मदत कर्जरूपी असली तरी त्याच्या परतफेडीबाबत जो तोडगा काढण्यात आला आहे तो पाहता अमेरिकेच्या हितसंबंधांची गडद छाया त्यावर स्पष्टपणे जाणवते. युरोपीय समुदायाच्या क्षेत्रातील रशियाच्या ज्या मालमत्तांवर टाच आणण्यात आली आहे, अशा मालमत्तांच्या व्याजातून युक्रेनला ही मदत प्राप्त होणार आहे. युक्रेनच्या मदतीसाठी आणखी बोजा उचलण्यास अमेरिकी जनतेचा मोठा विरोध आहे. मात्र, अमेरिकेला आपले हितसंबंध जोपासण्यासाठी युक्रेनला मदत करायची आहे. खरं तर युरोपीय देशांना या युद्धाची मोठी झळ सोसावी लागत असल्याने हे युद्ध संपावे हीच युरोपीय राष्ट्रांची इच्छा व गरजही आहे. त्यावर या परिषदेत विचार व्हायला हवा होता. मात्र, रशियाविरुद्ध आपला अजेंडा राबविणाऱ्या अमेरिकेविरोधात हे युरोपीय देश या परिषदेतही वेगळा सूर लावू शकले नाहीत.

जी-७ च्या मूळ उद्दिष्टांशी हे सुसंगत नाहीच. चीन रशियाला मदत करत असल्याबद्दल या परिषदेत निषेधाचे सूर उमटले खरे पण अशा सूरांना चीन भीक घालणे केवळ अशक्यच! हे असे घडते आहे कारण आर्थिक व औद्योगिक प्रगतीच्या जोरावर या देशांनी जगाचे पुढारपण आपल्याकडे घेतले असले तरी त्यांना स्वत:चे हितसंबंध जास्त प्राधान्याचे आहेत. त्यामुळे जगातील प्रश्न वा आव्हानांना भिडताना त्यांचा दृष्टिकोन सर्वसमावेशक व सर्वव्यापी ठरत नाही आणि म्हणूनच तो सार्वत्रिकरीत्या स्वीकारला जात नाही. जपानचा अपवाद वगळता पाश्चात्त्य देशांचा गट हीच या गटाची ओळख आहे. ती व्यापक करून जगाचा गट अशी बनवायची तर त्यात इतर देशांना सामावून घेणे, त्यांना विश्वासात घेणे गरजेचे आहे. इस्रायल-हमास संघर्ष संपवून तेथे शांतता प्रस्थापित व्हावी, ही भूमिकाही सर्वच जागतिक व्यासपीठांवरून घेतली जात असली तरी त्याबाबत कृतिशील पावले पडताना दिसत नाहीत. अशी कृतिशील पावले टाकण्याची वेळ आली की, एकमेकांवर दोषारोप सुरू होतात. त्यामुळेच या परिषदेत बायडेन यांची गाझाबाबतची भूमिका उचलून धरण्यात आली तरी प्रत्यक्षात हा संघर्ष थांबविण्यात ती कितपत उपयोगी पडेल, याबाबत साशंकताच व्यक्त होते आहे.

# जोधाप्रसादजी मोदी माध्यमिक विद्यालयात रंगला मुख्याध्यापक चंद्रकांत गायकवाड तथा सेवक बालासाहेब पवार यांचा सेवापूर्ती सन्मान सोहळा

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**अंबाजोगाई शहरातील श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे जोधप्रसादजी मोदी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य चंद्रकांत गायकवाड तसेच संस्थेचे सेवक बालासाहेब पवार यांचा त्यांच्या २५ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर त्यांचा सेवापूर्ती सन्मान सोहळा संस्थेच्या वतीने मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी संस्थेचे संस्थापक सचिव राजकिशोर मोदी, प्रा वसंत चव्हाण, प्राचार्य डॉ बाबू खडकभावी, संस्थेचे संचालक संकेत मोदी,शंभुलिंग शिवाचार्य महाराज संस्थांचे अध्यक्ष ,महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तसेच सर्व संचालक मंडळ उपस्थित होते.**

या सन्मान सोहळयाची सुरुवात दीपप्रज्वलन तथा माता सरस्वती देवीच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. या सन्मान सोहळ्याचे प्रास्तविक राजकिशोर मोदी यांनी केले. आपल्या प्रास्ताविकात राजकिशोर मोदी यांनी प्राचार्य चंद्रकांत गायकवाड तसेच बालासाहेब पवार यांना सेवापूर्तीनिमित्त त्यांना शुभेच्छा देत त्यांना यापुढील काळात निरोगी दीर्घायुष्य लाभो अशी सदिच्छा व्यक्त केली. प्राचार्य चंद्रकांत गायकवाड यांनी श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या शैक्षणिक भरभराटीत प्राचार्य चंद्रकांत गायकवाड यांचे मोठे योगदान असल्याचे राजकिशोर मोदी यांनी आवर्जून सांगितले. त्यांनी केवळ शैक्षणिक क्षेत्रातच नव्हे तर सामाजिक क्षेत्रात देखील भरीव अशी कामगिरी केली असल्याचे मोदी यांनी सांगितले. पळसखेड्या सारख्या ग्रामीण भागातुन येऊन देखील प्राचार्य गायकवाड यांनी शहरातील श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या जोधाप्रसादजी मोदी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांना शिक्षित करून मोठमोठ्या पदावर पोचण्यासाठी प्रेरित केले असल्याचे राजकिशोर मोदी यांनी प्राचार्य गायकवाड यांच्या सन्मानारार्थ भाष्य केले. यानंतर २५ वर्षांची प्रदीर्घ सेवा बजावून सेवानिवृत्त होत असल्याबद्दल प्राचार्य चंद्रकांत गायकवाड तसेच बालासाहेब पवार यांचा सपत्नीक उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शाल, श्रीफळ फेटा बांधून तसेच सन्मानचिन्ह देऊन सन्मान व सत्कार करण्यात आला. याप्रसंगी महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे,सचिव माधवराव पाटील, त्याचबरोबर सहसचिव सुनील मिटकरी यांनी



देखील आपले मनोगत व्यक्त केले. आपल्या सत्काराला उत्तर देतांना प्राचार्य चंद्रकांत गायकवाड हे अत्यंत भावूक झाल्याचे दिसून आले. त्यांनी राजकिशोर मोदी यांनी माझ्यासारख्या ग्रामीण भागातुन आलेल्या एका सामान्य शिक्षकावर विश्वास ठेवून संस्थेत काम करण्याची संधी दिली त्याबद्दल राजकिशोर मोदी यांचे आभार व्यक्त केले. राजकिशोर मोदी यांच्या विश्वासावर पात्र ठरत आपणही त्याचा विश्वास सार्थ ठरवत संस्थेत काम केले. ही संस्था माझी व मी या संस्थेचा याच भावनेने आपण गेली २४ ते २५ वर्ष काम केले. इतकी वर्षे काम करून आज आपण संस्थेच्या कार्यातून मुक्त होत आहोत ही भावना माझ्यासाठी अत्यंत दुःख व वेदनादायी असल्याचे गायकवाड यांनी सांगितले. माझ्या सेवाकाळात संस्थेच्या सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांचे वेळोवेळी सहकार्य लाभले. संस्थेचे संस्थापक सचिव राजकिशोर मोदी यांनी टाकलेला विश्वास, संस्थेच्या सर्व सहकाऱ्यांची साथ याच बळावर आपण या संस्थेत २५ वर्षे सेवा करू शकलो असल्याची भावना याप्रसंगी प्राचार्य गायकवाड यांनी व्यक्त केली. तसेच यापुढेही गरज पडल्यास संस्थेच्या कोणत्याही कामात आपण सदैव तत्पर राहुत अशी स्पष्टोक्ती देखील गायकवाड यांनी दिली. याप्रसंगी प्राचार्य गायकवाड यांनी संस्थेचे कार्यकारी संचालक संकेत मोदी, इंजिनिअरिंग कॉलेजचे प्राचार्य डॉ बी आय खडकभावी, प्रा वसंत चव्हाण यांचे देखील आभार व्यक्त केले. बालासाहेब पवार यांनी देखील श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळात २५ वर्षे सेवा केली. मोदी कुटुंव व बालाजी शिक्षण संस्था हा आपला निजी परिवार असल्याची भावना ठेवून त्यांनी आपले आयुष्य संस्था व मोदी कुटुंबासाठी खर्च केले. संस्थेचे संस्थापक सचिव राजकिशोर मोदी यांचे सारथ्य अनेक वर्षे बालासाहेब पवार यांनी मोठया शिताफीने केले. मोदी कुटुंबाने देखील त्यांच्यावर पुर्णतः विश्वास टाकला होता दाखविलेला विश्वास पवार यांनी सार्थ ठरविला.शेवटी प्रा चंद्रकांत गायकवाड व बाळासाहेब पवार यांनी मोदी कुटुंबप्रति ऋण व्यक्त केले. संस्थेच्या वतीने आयोजित सेवापूर्ती सोहळ्यास डॉ नवनाथ घुगे, डॉ राजेश इंगोले, डॉ सुधीर भिसे,डॉ रवी चव्हाण,डॉ होळंबे, डॉ संदीप चव्हाण, मुख्याध्यापक पवार सर , सुनील आवाड, जगताप सर, प्रा शाहूराव गुळभिले, गोविंद चव्हाण, गायकवाड आर बी आत्माराम चव्हाण, माजी सरपंच विठ्ठल चव्हाण, संदीपन चव्हाण, कल्याण भिसे, ऍड संतोष पवार, ऍड काकडे, तलाठी संतोष चव्हाण, रोटरी तथा कॉम्प्युटर वर्ल्ड चे संतोष मोहिते, प्रा एम असं लोमटे, घोडसे सर, शेतकरी संघटनेचे कालिदास आपेट, भाई मोहन गुंड, श्रीरंग तट सर , विक्रम गुरुजी, के यांच्यासह गायकवाड, पवार व मोदी कुटुंबावर प्रेम करणारे शेकडो नागरिक सहभागी झाले होते. या कार्यक्रमात डॉ राजेश इंगोले यांची इंडियन मेडिकल असोसिएशनच्या महाराष्ट्र राज्याच्या सांस्कृतीक समितीच्या अध्यक्षपदी बिनविरोध फेर निवड झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच जोधाप्रसादजी मोदी माध्यमिक विद्यालयाचा माजी विद्यार्थी आकाश बाळासाहेब चव्हाण याची जलसंपदा विभागामध्ये ( वर्ग २ ) पदी निवड झाल्याबद्दल त्यांचा सन्मान करून पुढील वाटचलीसाठी शुभेच्छादिल्या.या संपूर्ण कार्यक्रमाचे संचलन तथा आभार विजय रापतवार यांनी व्यक्त केले. हा सन्मान सोहळा पार पाडण्यासाठी श्री बालाजी शिक्षक प्रसारक मंडळाचे सर्व प्राध्यापक , शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी मोठ्या प्रमाणावर परिश्रम घेतले.

## नारायण राणे यांची खासदारकी रद्द करा

मुंबई । प्रतिनिधी

रत्नागिरी-सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघातून माजी केंद्रीय मंत्री आणि भाजप नेते नारायण राणे यांनी गैरमार्गाचा वापर करत लोकसभा निवडणुकीत विजय मिळवलेला आहे. त्यामुळे त्यांची निवड रद्द करावी. यासोबतच राणे यांच्यावर पाच वर्षे निवडणूक लढविण्यास आणि मतदान करणण्यास बंदी घालावी अशी मागणी शिवसेना ठाकरे गटाचे उमेदवार विनायक राऊत यांनी निवडणूक आयोगाकडे केली आहे. विनायक राऊत यांनी ज्येष्ठ वकील असीम सरोदे यांच्यामार्फत निवडणूक आयोगाला नोटीस पाठवून ही मागणी केली आहे. रत्नागिरी-सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघात नारायण राणे आणि विनायक राऊत आमने-सामने होते. गटा-तटाच्या लढतीत या निवडणुकीत राणे यांनी विनायक राऊत यांचा पराभव केला होता. मात्र, राणेंनी पैशाच्या जोरावर विजय मिळवला असल्याचा आरोप ठाकरे गटाचे माजी खासदार विनायक राऊत यांनी केला आहे. ५ मे रोजी निवडणूक प्रचार संपला असता भाजप कार्यकर्ते ६ मे रोजी सुद्धा नारायण राणे यांचा प्रचार करत होते. तर राणे समर्थक मतदारांना पैसे देत असल्याचे व्हीडीओही सर्वत्र प्रसारित झाल्याचे निवडणूक आयोगाला पाठवलेल्या नोटीसमध्ये नमूद करण्यात आले आहे. दरम्यान आयोग या प्रकरणावर कोणता निर्णय घेतो हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# भाजपा सरकारविरोधात २१ जून रोजी कॉँग्रेसचे ‘चिखल फेको’ आंदोलन

## महागाई, बेरोजगारी, परिक्षेतील घोटाळा, खते-बियाण्यांचा काळाबाजार, कायदा सुव्यवस्थे प्रश्नी आक्रमक भुमिका

**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्यातील जनता अनेक समस्यांचा सामना करत असताना महाभ्रष्टयुती सरकार त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहे. या सरकारने जनतेला वाऱ्यावर सोडून दिले आहे. या महाभ्रष्ट, निष्क्रीय सरकारच्या विरोधात काँग्रेस पक्ष शुक्रवार २१ जून रोजी राज्यातील सर्व जिल्हा मुख्यालयी सकाळी ११.०० वाजता सरकारच्या प्रतिमेस चिखल लावून ‘चिखल फेको’ आंदोलन करून भाजपाप्रणित सरकारचा निषेध करणार आहे.**

राज्यातील व केंद्रातील भारतीय जनता पक्षाचे सरकार हे शेतकरी, कष्टकरी, दलित, अल्पसंख्याक, महिला, तरूण, गरिब व सामान्य जनतेच्या विरोधातील आहे. छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज, महात्मा फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराने चालणाऱ्या महाराष्ट्राच्या प्रतिमेला काळिमा फासण्याचे काम या सरकारने केले आहे. मागील १० वर्षापासून भाजपा सरकारने राज्यातील औद्योगिक विकासाला खिळ घातली आहे. सरकारी नोकर भरती केली जात नाही. स्पर्धा परीक्षा वेळेवर घेतल्या जात नाहीत, ह्या परीक्षा घेतल्या तर पेपरफुटीचे ग्रहण लागते, शेतकरी संकटात आहे पण त्यांना मदत दिली जात नाही. कांदा, कापूस, सोयाबीन यासह कोणत्याही शेतमालाला भाव नाही, सरकार एमएसपी देत नाही. कठिण काळात जनतेला मदत करण्याऐवजी सरकार जनतेचे शोषण आणि आर्थिक पिळवणूक करत आहे. परिक्षेच्या पेपरफुटी व निकालातील गैरव्यवहारामुळे देशभरातील लाखो विद्यार्थ्यांचे भवितव्य सरकारने धोक्यात आणले आहे. महागाई, बेरोजगारी, पेपरफुटी, महिला सुरक्षा, खते, बि-बियाणांचा काळाबाजार, कर्जासाठी शेतकऱ्यांची होत असलेली अडवणूक, चिखलात सुरु असलेली पोलीस भरती, राज्यातील सरकारी रिक्त पदे भरण्याबाबत चालवलेली चालढकल, राज्यातील बिघडलेली कायदा व सुव्यवस्था बिघडलेली आहे. श्रीमंतांची पोर गोरगरिबांना गाड्याखाली चिरडून मारत आहेत. मुलींचे दिवसाढवळ्या रस्त्यावर खून पाडले जात आहेत. सत्ताधारी पक्षाकडून जाती धर्माच्या नावाखाली सामाजिक शांतता भंग करण्याचे प्रयत्न सुरु आहेत. या सरकारच्या विरोधात जनतेत तीव्र संताप असून सरकारला जाब विचारण्यासाठी आंदोलन केले जाणार आहे. या आंदोलनात जिल्ह्यातील प्रमुख नेते, माजी मंत्री, खासदार, आमदार, माजी खासदार, माजी आमदार, महिला काँग्रेस, युवक काँग्रेस, एनएसयुआय, सेवादल, इंटक, सेल व विभाग यांच्या पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी होऊन भाजर सरकारचा निषेध करणार आहेत.

# पुण्यात सलग दुसऱ्या दिवशी पोलिस भरतीविरोधात आंदोलन



**पुणे । प्रतिनिधी**

**राज्यात आजपासून पोलिस भरती प्रक्रिया सुरू झाली आहे. १७ हजार ४७१ जागांसाठी १७ लाख ७६ हजार २५६ अर्ज आले आहेत. तसेच कारागृह विभागातील भरतीसाठी १ हजार ८०० पदांसाठी ३ लाख ७२ हजारहून अधिक अर्ज आले असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.**

दरम्यान, पुण्यात पोलिस भरतीविरोधात सलग दुस-या दिवशी आंदोलन करण्यात येत आहे. सरकारविरोधात दंडवत घालत विद्यार्थी आंदोलन करत आहेत. पोलिस भरतीला वय वाढवून मिळावे या मागणीसाठी पुण्यात पोलिस भरतीची तयारी करणा-या विद्यार्थ्यांचे आंदोलन सुरू आहे. सन २०-२२ या वर्षाची पोलिस भरती २०२४ मध्ये होत आहे. २०२२ या वर्षातील पात्र विद्यार्थ्यांना या भरतीपासून वंचित राहावे लागत आहे. यासाठी वय वाढवून मिळावे या मागणीसाठी हे विद्यार्थी आंदोलन करत आहेत. मात्र सरकारने विद्यार्थ्यांच्या आंदोलनाकडे दुर्लक्ष केले आहे.

# मंदावलेल्या मान्सूनने वेग घेतला, या भागांत यलो अलर्ट जारी



**पुणे । प्रतिनिधी**

**नैऋत्य मौसमी वारे अर्थात मान्सून मुंबईत पोहोचल्यानंतर त्यांचा वेग मंदावला होता. पण आता मान्सून वेग घेत आहे. मान्सून २१-२२ जूनपर्यंत आणखी प्रगती करेल, असे भारतीय हवामानशास्त्र विभागाकडून बुधवारी सांगण्यात आले.**

‘‘मुंबईत पावसाचा वेग गेल्या दोन-तीन दिवसांत थोडा कमी झाला होता. पण आता त्याने वेग घेतला आहे. मान्सूनची सध्याची स्थिती मध्यम मजबूत स्वरुपाची दिसत आहे. येत्या २-३ दिवसांत मुंबई, ठाणे आणि रायगड परिसरासाठी यलो अलर्ट दिला आहे. संपूर्ण विदर्भासाठीही यलो अलर्ट जारी केला आहे. राज्यातील उर्वरित भागात अलर्ट नाही. पण तेथे मध्यम स्वरूपाचा पाऊस सुरू राहील’’ अशी माहिती मुंबई प्रादेशिक हवामान विभागाचे (आयएमडी) प्रमुख सुनील कांबळे यांनी दिली. मुंबईत मान्सून धडकल्यानंतर त्याचा वेग मंदावला होता. परंतु तो हळूहळू मध्यम होत आहे. २१-२२ जूनपर्यंत तो वेग घेईल आणि किनारपट्टी भागात चांगला पाऊस पडण्याची शक्यता असल्याचे त्यांनी म्हटले आहे. मराठवाड्यासह मध्य महाराष्ट्रात या काळात हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडेल, असेही त्यांनी सांगितले. बुधवारी सकाळी मुंबईतील अनेक भागात पावस पडला. मान्सून सामान्य वेळेपेक्षा दोन दिवस आधीच ९ जून रोजी मुंबईत दाखल झाला होता. तेव्हापासून त्यात फारशी प्रगती झाली नाही. अद्याप मान्सूनने उत्तर महाराष्ट्र आणि विदर्भाचा काही भाग व्यापलेला नाही.

### देशात २० टक्के पाऊस कमी

१ जून रोजी मान्सूनचा हंगाम सुरू झाल्यापासून देशात २० टक्के कमी पाऊस झाला आहे. जूनमध्ये सरासरीपेक्षा कमी पाऊस पडेल, असे मंगळवारी हवामान विभागाने सांगितले होते. जून आणि जुलै हा शेतीसाठी सर्वात महत्त्वाचा मान्सून कालावधी मानला जातो. कारण या काळात खरीप पिकाच्या बहुतांश पेरण्या पूर्ण होतात.

पान १वरून...

### एमएसपी कायद्याची त्वरित

याशिवाय, त्यांनी तरुणांच्या तक्रारी सोडवण्यासाठी युवा आयोग स्थापन करण्यासह तरुण शेतकऱ्यांमध्ये लघु उद्योगांना चालना देण्यावर टिकैत यांनी भर दिला. यादरम्यान टिकैत यांनी केंद्र सरकारवर जोरदार निशाणा साधताना, केंद्र सरकार सध्या कुबड्यांवर चालत असून देशातील जनतेने केंद्र सरकारला अपंग बनवले आहे. त्यामुळे ते किती दिवस टिकते हे पहावे लागेल, असे टिकैत म्हणाले. तर केंद्र सरकारचे पहिले टार्गेट पंजाब असून सरकार शीख समाजाला बदनाम करण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप टिकैत यांनी केला आहे. तर सरकार पाच ते दहा दिवसांत नवीन अधिकाऱ्यांची नियुक्ती करेल, असा दावा देखील टिकैत यांनी केला आहे.

------------

### मनोज जरांगे हा

घेताना हाके म्हणाले, मनोज जरांगे हा भंपक माणूस आहे, अशी बोचरी टिका त्यांनी यावेळी केली.

-------

### विधानसभा निवडणूक लढवणार,

मनोज जरांगे म्हणाले, सरकारला मी वेळ दिलेला नाही, सरकारने वेळ घेतला आहे. मी अगोदर देखील सांगितले होती की, आम्ही तयारी करतोय. माझा आणि माझ्या समाजाचा दोघांचाही राजकरणात येण्याचा कोणताही उद्देश नाही पण सरकारच आम्हाला राजकारणात ढकलत आहे. आम्ही पहिल्या टप्प्यात २४ मतदारसंघाची चाचपणी केली आहे. आम्ही शोध घेत आहे. आम्ही शांत का बसावे? कोणत्याही समाजावर अन्याय नाही झाला पाहिजे. इतर समाजांनी देखील आमच्यासोबत आले पाहिजे, यासाठी चाचपणी करत आहे.

---------

### शिवसेना फोडणाऱ्या नालायकांसोबत

करतात उद्धव ठाकरे मोदींसोबत जाणार. ज्यांनी शिवसेना फोडली, मातेसमान शिवसेनेला फोडले त्या नालायकांसोबत परत जायचे? आता त्यांची फाटलीय, असे ठाकरे म्हणाले. उद्धव ठाकरे यांनी यावेळी राज ठाकरे यांच्यावरही टीका केली. ते म्हणाले की, मला विरोध करण्यासाठी काही जणांनी उघड म्हणजे बिनशर्ट पाठिंबा दिला.

**मोदी हा ब्रँड होता आता ब्रँडी झाली – संजय राऊत**

खासदार संजय राऊत यांनी तुफान भाषण केले. मोदी हा ब्रँड होता आता ब्रँडी झाली आहे बहुतेक, ही आता देशी ब्रँडी झाली आहे, अशी घणाघाती टीका संजय राऊत यांनी केली. संजय राऊत म्हणाले, आजचा दिवस ऐतिहासिक आहे, फिनिक्स पक्षासारखी राखेतून भरारी आपण मारली. हा शिवाजी महाराज यांचा महाराष्ट्र आहे, तुमच्या सारख्या फडतूस माणसा समोर आम्ही झुकणार नाही. मोदी जन्माला आल्यावर चारशे खुळखुळे घेऊन जन्माला आले होते. ४०० पार हा जन्मसिद्ध अधिकार आहे असे वागत होते. मोदींचा खुळखुळा जर कोणी केला असेल तर तो उद्धव ठाकरेंनी केला आहे. तिकडे डोममध्ये (वरळी डोम) डोम कावळे जमलेत. कावळ्यांचे संमेलन किती भरले आहे. आमचा ५८ वा वाढदिवस सुरू आहे ते अडीच आहेत. असंख्य हुतात्माच्या बलिदानातून शिवसेना स्थापन केली. हे गुजरातचे सोमे गोमे आले. महाराष्ट्राचा वारसा उद्धव ठाकरे यांनी चालवला आणि यश मिळवले. भाजप आता आभार यात्रा धन्यवाद यात्रा काढणार आहे. कशाबद्दल? ४०० पार करणार होते. तुमच्या डोक्यावर परिणाम झाला आहे. अरे तुम्ही हरलाय. आणि आभार यात्रा काय काढताय? मोदी हा ब्रँड होता आता ब्रँडी झाली आहे.

-----------

### फडणवीराज संपणार; भाजपात कोअर

संतोष, सहसंघटन मंत्री शिवप्रकाश, महाराष्ट्र विधानसभा भाजप प्रभारी भूपेंद्र यादव आणि सहप्रभारी अश्विनी वैष्णव हे नेते देखील बैठकीत उपस्थित होते. तसेच या बैठकीत महाराष्ट्रातून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे,पियूष गोयल, मुंबई भाजपध्यक्ष आशिष शेलार, पंकजा मुंडे, सुधीर मुनगंटीवार, रावसाहेब दानवे, चंद्रकांत पाटील बैठकीला उपस्थित होते. यावेळी राज्यातील निर्णय हे कोण्या एकाने नव्हे तर कोअर कमेटीने घेण्याचे आदेश हायकमांडने राज्यातील प्रमुख नेत्यांना दिले. त्यामुळे गेल्या १० वर्षातील राज्य भाजपातील फडणवीसराज संपूष्टात येणार असल्याचे संकेत असून जेष्ट नेत्यांना सक्रीय करुन त्यांच्यावर जबाबदारी देण्याच्या सुचना यावेळी देण्यात आल्या. त्यामुळे पंकजा मुंडे, एकनाथ खडसे, विनोद तावडे, प्रकाश जावडेकर, माधव भंडारी यांच्या सारख्या निष्ठावंत नेत्यांना भाजपात चांगले दिवस येणार असल्याचे संकेत आहेत. तर उशिरा का होईना आयाराम-गयारामऐवजी भाजप यापुढे निष्ठावंतांवर विश्वास ठेवणार असल्याचे दिसते.

--------------

### महाराष्ट्रात जुलैपासून सर्वांना मिळणार

आश्वासन दिले होते, मात्र त्याची जवळपास वर्ष होत आले तरीही अंमलबजावणी करण्यात आलेली नव्हती. महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेसाठी सरकारकडून युनायटेड इंडिया अ‍ॅश्युरन्स कंपनीची निवड करण्यात आली आहे. सध्या दीड लाखाचा विमा ३० जूनपर्यंत असणार आहे. तर १ जुलैपासून ५ लाखांचा विमा लागू करण्यात येणार आहे. महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत लाभ घेण्यासाठी व्यक्तीकडे डोमिसाईल सर्टिफिकेट किंवा रेशन कार्ड असणे गरजेचे आहे. या दोनपैकी एक कागदपत्र असणे आवश्यक आहे, अन्यथा या योजनेचा लाभ घेता येणार नाही. सध्या या योजनेअंतर्गत १००० रुग्णालये आहेत. मात्र आता जुलैपासून आणखी ९०० रुग्णालये जोडली जाणार आहेत. त्यापैकी मुंबईत ५७ रुग्णालयांमध्ये उपचार केले जाणार आहेत. तसेच या विमा योजनेत १३५६ आजार कव्हर होणार आहेत. मूत्रपिंड, यकृत, हृदय आणि इतर अनेक आजारांवर उपचार केले जातील.

**रुग्णमित्र ठरतोय मदतगार...**

एखाद्या रुग्णाला डॉक्टरांनी अँजिओप्लास्टी करण्याचा सल्ला दिला असेल, तर डॉक्टर एक फॉर्म आणि पत्र लिहून देतील. तो फॉर्म आणि पत्र रुग्णालयातील ‘रुग्ण मित्र’ इथे द्यावा लागेल. आरोग्य योजनेंतर्गत रुग्णालयांमध्ये एक कक्ष स्थापन केला असून तिथे ‘रुग्ण मित्र’ रुग्णाचे रजिस्ट्रेशन करतो. तिथेच रुग्णाला रेशन कार्ड किंवा डोमिसाईलची झेरॉक्स द्यावी लागते. त्याशिवाय डॉक्टरकडून लिहून दिलेले पत्र जोडावे लागते. रुग्ण मित्राकडून सर्व कागदपत्रं ऑनलाईन अपलोड केल्यानंतर एमजेपीजेए कार्यालयात असलेली डॉक्टरांची समिती रुग्णाने डॉक्टरद्वारे भरलेल्या फॉर्मची छाननी होते. रुग्णाला खरोखरच उपचाराची गरज आहे, असे समितीला वाटल्यास अवघ्या काही तासांत अर्ज स्वीकारून लाभांतर्गत उपचारासाठी मान्यता दिली जाते.

----------

दैनिक
राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
गुरुवार दि. २० जून २०२४


## बीएमडब्ल्यू सौदा करुन नेली : साडेदहा लाख दिलेच नाही ; फसवणुकीचा गुन्हा दाखल

परळी : बीएमडब्ल्यूचा सौदा करु नेली मात्र दोन वर्षे झाले तरी सौद्यात ठरलेले साडेदहा लाख दिलेच नाही.याप्रकरणी आता छत्रपती संभाजीनगर येथील तीन जण व मुंबईचा एकजण अशा चौघांविरुद्ध परळी वैजनाथ शहर पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.याबाबत पोलीस सुत्रांकडून प्राप्त अधिक माहितीनुसार, फिर्यादी अमोल वामन चव्हाण वय २८ वर्षे व्यवसाय शेती व व्यापार रा. वसंतनगर तांडा ता. परळी वै.यांच्याशी आरोपींनी संगणमत करुन फिर्यादीचे मालकीची सन २०२१ मध्ये कार साउंड बायींग सेलींग ऑफ कार्स मुंबई (जुने गाडीचे लक्झरीचे विक्रेते) यांचेकडुन जुनी वापरती कंपनीचे मॉडेल ७३० कार क्रं. ०४ ००१६ पांढ- या रंगाची किंमत अंदाजे १३,७०,०००/- (तेरा लाख सत्तर हजार रुपये) माझ्या घरगुती वापरासाठी खरिदी केलेली होती. सन २०२२ मधे माझ्या ओळखीचे इसम नामे १) शोयब खान रा. छ. संभाजीनगर हा त्याचे ओळखीचे ईसम नामे २) मुजीब कुरेशी ३) नयीम कुरेशी दोन्ही रा. छत्रपती संभाजीनगर यांना माझी कार खरेदी करण्यासाठी ग्राहक म्हणून घेवुन आल्याने ओळख झाली होती. त्यानंतर दिनांक १७/१२/२०२२ रोजी पंचायत समिती जवळ परळी वै येथे माझी कार के. ०४ ००१६ ही शोयब खान याचे मार्फतीने त्यांचे ओळखीचे मुजीब कुरेशी व नयीम कुरेशी यांना रुपये १०,५०,०००/- (दहा लाख पंन्नास हजार रुपयाला ४) रफिक मेमन रा. मुंबई यांना रक्कम १०,५०,०००/-रुपये विक्री केली होती. त्यावेळी चौघांनी फिर्यादीची फसवणुक केली व पैसे देणेस टाळाटाळ केली म्हणुन शहर पोलीस ठाण्यात गुरनं. ८९/२०२३ कलम ४२०,४१७,३४ भादवि गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पुढील तपास पोना भताने हे करीत आहेत.

# महाउद्योजक रत्नदीप पुरस्काराने विनोद पोखरकर सन्मानित

## पुणे येथे सुप्रसिद्ध मराठी अभिनेत्री सायली संजीव यांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण; पोखरकर यांच्या निवडीचे मराठवाड्यातून स्वागत

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

येथील प्रसिद्ध व्यावसायिक तथा हॉटेल साई सुरभीचे संस्थापक विनोद सिद्राम आप्पा पोखरकर यांना टायकोन्स ऑफ एशिया यांच्या वतीने दिला जाणारा प्रतिष्ठेचा महाउद्योजक रत्नदीप पुरस्कार - २०२४ नुकताच पुणे येथे आयोजित एका विशेष समारंभात सुप्रसिद्ध मराठी अभिनेत्री सायली संजीव यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. पोखरकर यांच्या निवडीचे मराठवाड्यातून स्वागत होत आहे.

प्रसिद्ध व्यावसायिक तथा हॉटेल साई सुरभीचे संस्थापक विनोद सिद्राम आप्पा पोखरकर यांना टायकोन्स ऑफ एशिया यांच्या वतीने दिला जाणारा प्रतिष्ठेचा महाउद्योजक रत्नदीप पुरस्कार - २०२४ हा रविवार, दिनांक १६ जुन रोजी पुणे येथे आयोजित एका विशेष समारंभात सुप्रसिद्ध मराठी अभिनेत्री सायली संजीव यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. खरे तर जीवनाच्या प्रवासात यशाला कधीच शॉर्टकट नसतो हे वास्तव कोणी ही नाकारू शकत नाही. जीवनामध्ये स्वतःला यशाच्या उच्च शिखरावर घेऊन जाण्यासाठी कष्टाशिवाय पर्याय नाही. ज्यांनी यशाचे हे गमक जाणले तो मात्र जीवन प्रवासात कितीही संकटे आली तरी यशाला गवसणी घालणारच हे मात्र नक्की. असेच एक आपल्या सर्वांसमोर असलेले यशस्वी व्यक्तिमत्व म्हणजे विनोद पोखरकर होय हे होय. आज आपण समाजामध्ये पाहत आहोत की, अनेक युवक उच्च शिक्षित असून ही नौकरी मिळत नाही म्हणून बेरोजगार आहेत. परंतु, उच्च शिक्षण घेऊन ही पोखरकर यांनी नौकरीच्या मागे न लागता. व्यवसायाच्या माध्यमातून सातत्यपूर्ण मेहनत घेत, कठोर परिश्रम करून समाजात स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. प्रामाणिकपणे व्यवसाय केला तर आपल्या समाजात उच्च स्थान मिळवून आदर्शवत जीवन जगता येतं हे विनोद पोखरकर यांनी दाखवून दिले आहे. आज अंबाजोगाई शहरात हॉटेल साई सुरभी या उद्योग समूहाच्या माध्यमातून त्यांनी अनेक युवकांना रोजगाराची संधी उपलब्ध




करून दिली आहे. त्या सोबतच ते स्वतःही आपल्या व्यवसायामध्ये पूर्ण योगदान देऊन व्यवसायाच्या माध्यमातून अंबाजोगाई शहरातील व पंचक्रोशीतील समाजातील जे वंचित, उपेक्षित घटक आहेत. त्यांच्या स्वतःच्या व्यवसायातून मिळालेल्या आर्थिक उत्पन्नातून ते सामाजिक योगदान देतात. पोखरकर हे कुशल संघटक आहेत. स्वतःचा व्यवसाय सांभाळून ते सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करीत आहेत. विशेषतः कोविड काळात केलेले जनसेवेचे प्रभावी सामाजिक कार्य, समाजातील गरजू, गोरगरीब, होतकरू तरूण वर्गाला ते करीत असलेले भरीव सहकार्य आणि त्यांचा बीड जिल्ह्यासह मराठवाड्यात असलेला त्यांचा मोठा जनसंपर्क आहे. यापूर्वी अंबाजोगाईत विनोद पोखरकर यांचे पुढाकारातून महात्मा बसवेश्वर सार्वजनिक जयंती उत्सव सुरू करण्यात आला. याच धर्तीवर अंबाजोगाई व केज तालुक्यातील १४ हून अधिक गावांमध्ये जयंती उत्सव सुरू झाला. मराठवाड्यातील सर्वांत मोठा २५० सदस्य असलेला पुरूष बचत गट विनोद पोखरकर व मित्र परिवाराने सुरू केला. ते दरवर्षी गुणवंत विद्यार्थी गुणगौरव तसेच मान्यवर यांचे सत्कार करतात. पुढील काळात विद्यार्थ्यांना मदत, मोफत रूग्णवाहीका आणि बचत गटाचे रूपांतर बँकेत करण्याचा पोखरकर यांचा मानस आहे. विनोद हे स्वतःला नेहमीच विविध सामाजिक कार्यात झोकून देतात. शहरातील व ग्रामीण भागातील लोकांच्या समस्या असतील यावर ते तोडगा काढण्याचे काम स्वखर्चाने करतात. सर्वसामान्यांसाठी सतत धडपडणारे व्यक्तीमत्व म्हणून त्यांची महाराष्ट्राभर ओळख आहे. ते दरवर्षी उन्हाळ्यात सामाजिक बांधिलकीतून लोकांना पिण्याचे थंड पाणी मिळावे या उद्देशाने मोफत पाणपोई सुरू करतात. याकामी त्यांना लहान बंधू प्रमोद पोखरकर व कुटुंबियांचे मोठे सहकार्य आणि आई - वडील व गुरूजणांचा आशिर्वाद लाभत आहे. आपण करीत असलेल्या कार्याची दखल समाज नक्कीच घेतो यावर त्यांचा विश्वास आहे. सबंध महाराष्ट्रातील उद्योजक यांना त्यांच्या कार्याबद्दल व समाजातील नवयुवा उद्योजकांना प्रेरणा मिळावी म्हणून टायकोन्स ऑफ आशिया यांच्या माध्यमातून दरवर्षी पुरस्कार देऊन सन्मानित केले जाते. यावर्षीचा २०२४ चा हा महाउद्योजक रत्नदीप पुरस्कार हॉटेल साई सुरभीचे संस्थापक युवकांसाठी एक प्रेरणादायी असणारे व्यक्तिमत्व, सर्वांचे लाडके विनोद पोखरकर यांना रविवारी महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी पुणे येथे प्रदान करण्यात आला. त्याबद्दल विनोद सिद्राम आप्पा पोखरकर व हॉटेल साई सुरभी उद्योग समूह यांचे सर्वस्तरांतून स्वागत होत आहे.

# अश्विनीताई परमेश्वर घोडके यांचा वाढदिवस वृक्षारोपण करून साजरा

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील सुलेमान देवळा गावांतील समाजसेवक श्री. परमेश्वर रामचंद्र घोडके यांच्या पत्नी अश्विनीताई घोडके यांचा वाढदिवस निमित्ताने घोडके कुटुंबाने वृक्ष रोपण करून समाजाला एक चांगल्या संदेश दिलाआहे.

घोडके कुटुंब हे नेहमी सामाजिक चळवळीत कामं करणारे कुटुंब म्हणून तालुक्यात त्यांची ओळख आहे. आज त्यांनी त्यांच्या शेतात, चिंच, शिवण ,अंबा, जांभूळ ,बांबू ,वड, पिंपळ,व मौहाचे पन्नास झाडे लावले आहेत. जाणीवपूर्वक हे झाड लावण्याचे कारण असे की हे झाडे खूप मोठे होतात.



त्यांच्या फळापासून व बियांपासून पशुपक्षी व प्राण्यांना खाद्य म्हणून उपयोगात येतात. मोठ मोठ्या वृक्षामुळे जमिनीची धूप व उष्णता कमी होते. व पाऊस पडण्यात मदत होते. वृक्षारोपणाची आज गरज असल्याकारणाने, समाजात घराघरात कौटुंबिक सणं उत्साहाच्या दिवशी किमान पाच-दहा झाडे लावावेत असा एक संदेश या माध्यमातून देण्यात आला आहे. स्वतःच्या शेतात झाडे लावण्याचा उद्दिष्ट त्यांनी समाजापुढे असा ठेवला आहे की ते झाडे शंभर टक्के जगवण्याची हमी त्या कुटुंबाची असते. पुढे पिढीसाठी धन दौलत शिक्षण संस्कार सोबतचं निसर्गाचा समतोल राखने सुद्धा काळांची गरज आहे. प्रत्येक कुटुंबाने, व्यक्तीने आपल्या शेतात व सार्वजनिक ठिकाणी झाडे लावने काळांची गरज आहे . घराघरात वृक्षारोपण मोहीम पोहोचवण्याचा त्यांनी आज संदेश अश्विनीताई परमेश्वर घोडके यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने दिला आहे.

# महिलांनी हेवेदावे सोडून कुटुंबव्यवस्था सदृढ बनवावी -भूतडा

**माजलगाव । प्रतिनिधी**

तुझं माझ करण्यापेक्षा महिलांनी हेवेदावे सोडून कुटुंब व्यवस्था सदृढ बनवण्याकडे लक्ष देने काळाची गरज आहे.डोळ्यावर विशिष्ट रंगाचा चष्मा चढवल्यास आपले व्यक्तिमत्व प्रगल्भ होण्याऐवजी दुर्लक्ष करण्याजोगे होते. असे प्रतिपादन सी ए सौ मनाली भूतडा यांनी महेशनवमी निमित्त राजस्थानी मंगल कार्यालयात आयोजित महेशरत्न पुरस्कार वितरण सोहळ्यात केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्रीमती लिलादेवी मानधने, व्यासपीठावर पालक समुपदेशक मीरा बंग,तालुकाध्यक्ष उमेशकुमार जेथलिया, राधेश्याम लोहिया, संतोषबापू जेथलिया, राजेंद्र इंदानी, सागर मानधने, रमेश चांडकं, डॉ



कमलकिशोर लड्डा, गोपाल मानधने,सौ भाग्यश्री करवा,रामकुमार खण्डेलवाल, सचिन रेदासनी सौ माय चांडकं, सरोज तोष्णनिवाल,सौ किरण गिलडा उपस्थित होते. यावेळी जुगलकिशोर झंवर, जुगलकिशोर भूतडा यांना महेशरत्न पुरस्कार देऊन गोरविण्यात आले. सामाजिक उपलब्धी निमित्त अनेकांना गौरविण्यात आले.यावेळी मानधने परिवाराकडून महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विनोदकुमार जाजू प्रास्ताविक उमेशकुमार जेथलिया तर आभार नवलकिशोर काबरा यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी तालुका माहेश्वरी सभेचे पदाधिकारी, युवा सभेचे पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले.

### प्रतिकूल परिस्थितीत विक्रमांना गवसनी

माजलगावची भाची असलेल्या मीरा बंग यांनी जन्मतच सिरीबरलं प्लासी या दुर्धर आजाराने ग्रस्त आपली मुलगी कृष्णा हिला पतीच्या निधनानंतर स्वतः फिजिओ थेरपी डॉ बनून सामान्य लेकरासारखे बनवण्याचा प्रयत्न केला. आज कृष्णा बंग हीने जागतिक स्तरावर २५ विक्रम केले असून ११ जागतिक पुरस्कार मिळवले आहे. तिची ही प्रतिकूल परिस्थिती वर मिळवलेली मात मीरा बंग यांनी आपल्या शब्दातून सांगत उवस्थिताना हेलावून टाकले.

# सुलतानपूर येथे अहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्त मोफत नेत्र तपासणी व चष्मे वाटप

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यातील सुलतानपूर येथे राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. जयंती उत्सव समितीच्या वतीने मिरवणुकीवर खर्च न करता सामाजिक व लोकोपयोगी उपक्रम राबविण्यात आला. देवदूत प्रतिष्ठानच्या मदतीने पंचक्रोशीतील २०० पेक्षा जास्त गरजवंत महिला व पुरुषांच्या डोळ्याची तपासणी करून त्यांना चष्मे वाटप करण्यात आले. ॲड.संतोष बाबरे व त्यांच्या सहकाऱ्यांच्या वतीने



राबवण्यात आलेल्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

नेत्र तपासणी व चष्मे वाटप कार्यक्रमास उपस्थित असलेल्या महिलांच्या हस्ते रणरागिणी लोकमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून शिबिरास सुरुवात करण्यात आली. यावेळी देवदूत प्रतिष्ठानचे अध्यक्ष बंडूजी खांडेकर, सामाजिक कार्यकर्त्या संजीवनी राऊत, एकनाथ हंगरगे, युवा नेते तुकाराम आमनर, अशोक केसकर आदी उपस्थित होते. देवदुत डॉ. ओमप्रकाश शेटे यांच्या मार्गदर्शनाखाली सदरील स्तुत्य उपक्रम राबवण्यात आला. वाड्या वस्तीवर राहणाऱ्या नागरिकांना गावातच डोळे तपासून मोफत चष्मे मिळाल्यामुळे त्यांनी आनंद व्यक्त केला. दिवसभरात पार पडलेल्या मोफत नेत्र तपासणी व चष्मे वाटप शिबिरात नित्रूड पंचक्रोशीतील अनेक गावातील गरजू, वृद्ध, वंचित, विधवा, मजुर महिलांसह आबालवृद्धांनी सहभाग नोंदविला. नेत्र तज्ञ डॉ.जालिंदर चेंडके यांनी आत्याधुनिक मशीनद्वारे डोळ्यांची तपासणी केली. सुलतानपूर येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंतीचे वैशिष्ट्य म्हणजे डोळ्यांची तपासणी व चष्मे वाटप या कार्यक्रमासोबतच सायंकाळी प्रबोधनाचा कार्यक्रम सुद्धा घेण्यात आला. यावेळी यशवंत सेनेचे अध्यक्ष बाळासाहेब दोडतले, बंडूजी खांडेकर, व्याख्याते तथा इतिहास अभ्यासक महेश पिंगळे, सरपंच कॉम्रेड दत्ता डाके, ॲड.जयराम सजगणे, ॲड.अविनाश कांडुरे, ॲड. सचिन बडे, अजय तिडके, राष्ट्रवादी ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष विजय धायगुडे, मल्हारी मार्तंड अर्बन चे चेअरमन विशाल देवकते, युवा व्याख्याते गोविंद गोचडे, विष्णुपंत नेमाटे, संतोष व्हरकटे, आप्पासाहेब बडे आदी मान्यवर उपस्थित होते.

# महिला महाविद्यालयात त्रिदिवसीय योग कार्यशाळेचे आयोजन

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

नावीन्यपूर्ण उपक्रम राबविण्याबाबत अग्रेसर असलेल्या येथील लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयामध्ये आंतरराष्ट्रीय योगदिनाचे औचित्य साधून ' स्त्री सशक्तीकरणासाठी योग ' या संकल्पनेला अनुसरून त्रिदिवसीय महिला योग प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. संस्कृत विभाग , राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि क्रीडा विभागाच्या संयुक्त विद्यमाने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.त्याचा उद्घाटन सोहळा आज संपन्न झाला . कार्यक्रमाच्या अध्यक्षा व उद्घाटक म्हणून म्हणून महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ विद्याताई देशपांडे या उपस्थित होत्या , डॉ . खेडकर के पी . आणि डॉ विलास देशपांडे यांची विशेष उपस्थिती होती तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून संस्कृत विभाग प्रमुख डॉ.अरुण चव्हाण उपस्थित होते. उद्घाटन सोहळ्याचे प्रास्ताविक डॉ . दिग्रसकर यांनी केले. त्यांत त्यांना योगाची जीवनातील आवश्यकता सांगून योग परंपरेचा आढावा घेतला . उद्घाटनानंतर कार्यशाळेचे प्रथम पुष्प गुंफताना प्रा.डॉ. अरुण चव्हाण यांनी योग शब्दाची व्युत्पत्तिसिद्ध व्याख्या सांगून आंतरराष्ट्रीय योग दिनाबद्दल सविस्तर माहिती सांगितली. महिलांच्या सशक्तीकरणासाठी योग कसा महत्वाचा आहे याबद्दलही त्यांनी यथार्थ विवेचन केले . विद्यार्थिनींची आहारचर्या, दिनचर्या याबद्दलही मार्गदर्शन केले.

अध्यक्षीय समारोप करतांना प्राचार्या डॉ . विद्या देशपांडे यांनी योगाचे स्त्रीजीवनातील महत्व सोदाहरण विशद केले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ . दिग्रसकर यांनी केले तर रासेयोच्या डॉ . कल्याणकर आर बी . यांनी आभार मानले . या कार्यशाळेसाठी महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद , शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थिनी वर्ग मोठ्या प्रमाणावर उपस्थित होता .

पान ६ वरून...

## संविधान साक्षरतेचा विस्तार

येथे आयोजित आम्ही भारताचे लोक या लोकसंवाद कार्यक्रमात त्या ' संविधान साक्षरता ' या विषयावर बोलत होत्या. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ॲड शाम तांगडे होते. या कार्यक्रमाच्या सुरुवातीस डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. नंतर संविधान उद्देशिकेचे सुहीक वाचन करण्यात आले. या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करतांना ॲड शाम तांगडे म्हणाले की ' लोकसंवाद ' या उपक्रमातून आम्ही लोकांचे विचार व कृती जाणून घेत आहोत. संविधान लोकाभिमुख व्हावे यासाठी हा उपक्रम आहे. संविधान साक्षरतेसाठी प्रथम संवेदनशील जनाधार कोणता आहे हे समजून घेणे महत्वाचे आहे. संविधानाशी संवेदनशील असणारा जनाधारच या विस्ताराचा आधार होऊ शकतो. तोच संविधान साक्षरतेची लोकचळवळ गतीमान करू शकतो. यासाठी प्रथम संविधान साक्षरतेचे कार्य करणाऱ्यांचे संघायन व्हायला हवे. असे ते म्हणाले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन डॉ किर्तीराज लोणारे यांनी केले. प्रास्ताविक ॲड संदीप थोरात यांनी केले. तर संजय हतागळे यांनी आभार व्यक्त केले. याप्रसंगी मिलींद कांबळे , बाबुराव मस्के , विश्वनाथ सावंत , बलभीम बनसोडे , अनंत सरवदे आदींची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचा समारोप राष्ट्रगीताने करण्यात आला.

## रमाई आवास घरकुल व मोदी

अल्प रक्कम असल्याने घरकुल बाधण्यासाठी अनेक समस्यास सामोरे जावे लागत आहे. शासन जीआर नुसार सहाशे रुपये ब्रास प्रमाणे वाळू गोरगरीब लोकांना त्यांचे मंजूर झालेल्या घरकुलसाठी तहसीलदार माजलगाव यांनी तात्काळ द्यावी अशी मागणी निवेदकांनी केली आहे, माजलगाव तालुक्यातील ग्रामीण, व शहरातील अनधिकृत वाळु ढिगारे जमा झालेले आहे ते जप्त करून त्याचे लिलाव करून शासन परिपत्रकानुसार पंचायत समिती यांच्याकडून घरकुलधारकांची यादी मागवुन घ्यावीअसे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडीया चे जिल्हा सरचिटणीस नईम आतार यांनी निवेदन देवुन मागणी केली घरकुल बांधण्यासाठी वाळू सहा ब्रास वाळू असा शासन परिपत्रका मध्ये नमुद आहे परीपत्रक प्रमाणे देण्यात यावी या मागणीसाठी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया चे जिल्हा सरचिटणीस नईम आतार यांनी विभागीय आयुक्त कार्यालय संभाजीनगर व जिल्हाधिकारी कार्यालय बीड व उपविभागीय अधिकारी माजलगाव,तहसिलदार माजलगाव यांच्याकडे निवेदनद्वारे मागणी केली आहे.

## जिल्हा परिषद शाळा, गटशिक्षणाधिकारी

लागण्याची शक्यता आहे सदर कार्यवाही ही प्राधान्य क्रमाने पुढील १८० दिवसांमध्ये करण्याबाबत तिन्ही शिक्षणाधिकारी सर्व गटशिक्षणाधिकारी यांनी प्राधान्य क्रमाने पाऊले उचलून पूर्ण करण्याबाबत निर्देशित करण्यात येते.सदर कार्यवाही होईपर्यंत हा पत्र व्यवहार इलेक्ट्रॉनिक माध्यमातून करण्यासाठी खालील प्रमाणे निर्देश देण्यात येतात.

१) जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, केंद्रीय प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा व गटशिक्षणाधिकारी कार्यालय व शिक्षणाधिकारी कार्यालय यांचे ई-मेल आयडी वर तयार करण्यात यावेत. २) सदर ईमेल आयडी कसे करावेत याची उदाहरणादाखल खालील प्रमाणे कार्यपद्धती आखून देण्यात येते.

अ) जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जरेवाडी तालुका पाटोदा जिल्हा बीड या शाळेचा ई-मेल आयडी खालील प्रमाणे असावा. ब) जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा जामगाव ता. आष्टी या शाळेचा ईमेल आयडी खालील प्रमाणे असावा क) जिल्हा परिषद माध्यमिक शाळा उमापुर ता. गेवराई जिल्हा बीड या शाळेचे मेल आयडी खालील प्रमाणे असावा.ड) गटशिक्षणाधिकारी केज ता. केज जिल्हा बीड यांचा याकार्यालयाचा ईमेल आयडी खालीलप्रमाणे असावा. ई) शिक्षणाधिकारी(प्रा.),शिक्षणाधिकारी(मा.)व शिक्षणाधिकारी(यो)यांचे ई-मेल आयडी खालीलप्रमाणे तयार करण्यात यावेत. ३) सदर ई-मेल आयडी तयार करताना जो भ्रमणध्वनी क्रमांक जोडण्यात येतोय तो केंद्रीय प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक किंवा जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील वरिष्ठ शिक्षक यांचा असावा .अशा ई-मेल आयडी चा पासवर्ड शाळेतील ज्याचा भ्रमणध्वनी जोडला आहे व ज्येष्ठ शिक्षक आहे त्याच्या स्वाक्षरीने पत्रव्यवहार होतो त्याच्याकडे असावा व सदर पासवर्ड सुरक्षित ठेवण्याची तो त्यांनी इतर कोणाला न देण्याची त्याची जबाबदारी राहील.४) जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतून केंद्रीय प्राथमिक शाळेत होणारा पत्रव्यवहार व केंद्रीय प्राथमिक शाळेतून गटशिक्षणाधिकारी यांना होणारा पत्रव्यवहार हा पत्र स्वरूपात करावा.

प्रत्येक ई-मेल च्या विषयांमध्ये संक्षिप्तपणे विषय नमूद करण्यात यावा .पत्र व्यवहारांमध्ये जोडण्यात येऊ नयेत. पत्रव्यवहार करताना ज्या स्वरूपातील कागदपत्रांचा समावेश पत्रात करण्यात आला आहे. त्याच्या संचिकांची नावे सोप्या पद्धतीने व स्पष्ट नमूद करण्यात यावीत. सदर सर्व पत्र व्यवहारांच्या मध्ये गटशिक्षणाधिकारी व शिक्षणाधिकारी यांचा समावेश न चुकता करावा. आर्थिक बाबीच्या पत्र व्यवहारांमध्ये किंवा मागण्या, वितरण आदेश यासाठी जेव्हा पेन स्वाक्षरीत हार्ड कॉपी देणे आवश्यक आहे अशा पत्र व्यवहाराचे हस्तांतर जेव्हा केंद्रीय प्राथमिक शाळेमध्ये पंधरवाडी बैठका होतात तेव्हाच करण्यात यावे.५) ईमेल आयडी चा पासवर्ड ज्यांच्या ताब्यामध्ये व ज्यांचा भ्रमणध्वनी क्रमांक जोडला आहे अशा ज्येष्ठ शिक्षकांची बदली झाल्यानंतर त्यांनी नव्याने येणाऱ्या शिक्षकाला हा पासवर्ड हस्तांतरित करावा. नव्याने रुजू होणाऱ्या शिक्षकांनी पासवर्ड बदलावा व पासवर्ड बदलताना या शीर्षाखाली ईमेल आयडीला जोडलेला भ्रमणध्वनी सुद्धा बदलावा. ही कार्यभार देणाऱ्या व कार्यभार घेणाऱ्या शिक्षकांची जबाबदारी असेल. यापुढे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, केंद्रीय प्राथमिक शाळा, जिल्हा परिषद माध्यमिक शाळा, व गटशिक्षणाधिकारी यांच्यामध्ये होणारा सर्व पत्र व्यवहार हा इलेक्ट्रॉनिक स्वरूपामध्ये ई-मेलवर करण्यात यावा. पत्रव्यवहारासाठी व्हाट्सअप, फेसबुक, टेलिग्राम, अशा समाज माध्यमांचा वापर बहुतांश टाळण्यात यावा .अति अपरिहार्य परिस्थितीमध्ये या समाज माध्यमांचा वापर करून पत्रव्यवहार करण्यात आला तर अशाप्रती पुन्हा २४ तासात ईमेलवर सर्क्युलेट करण्यात याव्यात.६) सदर कार्यवाही ही फक्त सर्व शिक्षक, सर्व शिक्षणाधिकारी, यांचे ई-ऑफिस या प्रणालीवर ईमेल आयडी तयार होईपर्यंत तात्पुरती व्यवस्था म्हणून करण्यात येत आहे. ई- ऑफिस प्रणालीवर ईमेल आयडी तयार झाल्यानंतर ही व्यवस्था संपुष्टात आणून शासनाने निर्देशित केल्याप्रमाणे ई-ऑफिस प्रणाली वापरण्यात यावी. ७) यापुढे पत्रव्यवहार दाखल करणे या कामासाठी कोणत्याही शिक्षकांना अशा जबाबदारी देण्यात येऊ नये किंवा अशा कारणासाठी शिक्षकांनी मुख्यालय सोडल्यास ती त्यांची गैरहजरी ग्राह्य धरण्यात यावी.८) गटशिक्षणाधिकारी, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), (माध्यमिक) यांनी सुद्धा असा पत्र व्यवहार हार्ड कॉपी ऑफिस स्वरूपामध्ये करण्यासाठी कोणताही आग्रह धरू नये असे आवाहन बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अविनाश पाठक यांनी केले आहे.

## मयताच्या खात्याची केवायसी

एकुण ९८,०००/- रूपये काढून घेतल्या बाबतचा संदेश माझी मुलगी नामे विना विनायक काठेवाडे हिचे मोबाईल वर आला त्याबाबत मी माझी मुलगी नामे विना विनायक काठेवाडे हिचे मोबाईल आलेल्या संदेशाचे स्क्रिनशॉट, पासबुकची झेरॉक्स व आधारकार्ड या तक्रारी सोबत जोडत असुन आमचे परस्पर सदरील मयत व्यक्तीच्या खात्यावरील रक्कम उचलणाऱ्याा अज्ञात व्यक्तीचर कठोर कार्यवाही करण्याची मागणी स्टेट बँक ऑफ इंडियाच्या शाखा व्यवस्थापका कडे मयताची पत्नी वेणुबाई व्यंकटराव साबळे यांनी केल्यानंतर लगेचच पुन्हा मयताच्या खात्यात ४९ हाजार रुपये जमा झाल्याचा संदेश देखील त्यांच्या मुलीच्या मोबाईलवर धाक्कादायकरित्या आला आहे.

**बँक अधिकाऱ्यांवर व दललावर फसवणुकीचा गुन्हा कारा-ऑड गोले पाटील**

स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा पोस्ट ऑफिस जवळ माजलगाव बँकेचा अजब कारभार पाहायला मिळाला असुन तालुक्यातील केसापुरी येथील मयत व्यंकटराव साबळे यांच्या बचत खात्यावर जमा असलेली रक्कम उचलण्यास स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा माजलगाव येथील बँकेतील अधिकाऱ्यासह कर्मचारी यांनी दलाला सोबत संगणमत करून ९८०००/रुपायांची रक्कम उचलली असून संबंधितावर फसवणुकीचे गुन्हे दाखल करून बँकेच्या अधिकाऱ्यांना तात्काळ निलंबन करा अन्यथा शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने स्टेट बँक ऑफ इंडियाच्या क्षेत्रीय कार्यालयासमोर तीव्र आंदोलन करण्यात येईल.

-भाई ॲड.नारायण गोले पाटील,नेते शेतकरी कामगार पक्ष माजलगाव

# आजपासून पावसाचा जोर वाढणार

## पंजाबराव डखांचा अंदाज

गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्रात पावसाचा जोर कमी झाला आहे. यामुळे राज्यातील शेतकरी बांधव चिंतेत आले आहेत. मान्सूनची वाटचाल सुरुवातीच्या टप्प्यात खूपच तीव्र होती. पण आता मान्सूनची वाटचाल कमालीची रखडली असून याचा परिणाम म्हणून महाराष्ट्रातील अनेक भागांमध्ये पावसाची उघडीप पाहायला मिळत आहे. मात्र, आता पंजाबराव डख यांनी वर्तवलेल्या अंदाजानुसार काही जिल्ह्यात जोरदार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. राज्यात सध्या काही ठिकाणी पावसाचा जोर कमी झाला आहे. ज्या शेतकरी बांधवांनी पेरणी योग्य पाऊस झालेला नसतानाही पेरणीचा निर्णय घेतला होता, त्यांचा जीव आता टांगणीला लागला आहे. अशातच एक मोठी बातमी समोर आली आहे. आजपासून राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये पुन्हा एकदा पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे. तर काही जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी वादळी पावसाची शक्यता आहे. काल राज्यातील कोकण, मध्य महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाड्यातील काही जिल्ह्यांमध्ये हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस झाला आहे.

विदर्भात अजूनही दमदार पाऊस नाहीच

आतापर्यंत एकदा का होईना राज्यातील



जवळपास सर्वच विभागात मुसळधार पाऊस झाला आहे. पण, विदर्भ याला अपवाद आहे. विदर्भात अजूनही दमदार पाऊस झालेला नाही. म्हणून त्या ठिकाणी शेतकऱ्यांच्या पेरण्या बाकी आहेत. खानदेश आणि विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये अद्याप मान्सून पोहोचलेला नाही. गेल्या काही दिवसांपासून मान्सूनचा प्रवास थबकला असल्याने येथील शेतकऱ्यांची चिंता आणखी वाढली आहे. पावसाने ओढ दिल्याने विदर्भ विभागातील अनेक भागात कमाल तापमान वाढल्याची माहिती पंजाबराव डखांनी दिली आहे.

दक्षिण कोकणात आणि मध्य महाराष्ट्रातील घाटमाथ्यावर जोरदार पावसाची शक्यता : काही ठिकाणी कमाल तापमान ४२ अंश सेल्सिअस पर्यंत पोहोचले आहे. आजपासून राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये पावसाचा जोर वाढण्याची शक्यता व्यक्त केली आहे. आज दक्षिण कोकणात आणि मध्य महाराष्ट्रातील घाटमाथ्यावर जोरदार पावसाची शक्यता आहे. दक्षिण कोकणातील रायगड, सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी तसेच मध्य महाराष्ट्रातील पुणे आणि सातारा जिल्ह्याच्या घाटमाथ्यावर जोरदार पावसाची शक्यता आहे. या पाचही जिल्ह्यांसाठी आज हवामान खात्याने जोरदार पावसाचा येलो अलर्ट दिला आहे. तसेच आज भारतीय हवामान खात्याने मराठवाड्यातील हिंगोली, नांदेड या दोन जिल्ह्यात हलका ते मध्यम पाऊस होणार अशी शक्यता वर्तवली गेली आहे. तसेच विदर्भातील सर्वच्या सर्व ११ जिल्ह्यांमध्ये आज हलका ते मध्यम पावसाची शक्यता आहे. म्हणजे मराठवाडा आणि विदर्भात पावसाचा जोर कमीच राहणार असल्याचे पंजाबराव डख म्हणाले.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१८३७ : व्हिक्टोरिया इंग्लंडच्या राणीपदी
१८४० : सॅम्युअल मोर्स यांना टेलिग्राफ चा पेटंट मिळाला.
१८६३ : वेस्ट व्हर्जिनिया अमेरिकेचे ३५ वे राज्य बनले.
१८७७ : अलेक्झांडर ग्रॅहॅम बेल यांनी कॅनडा मध्ये जगातील पहिल्या व्यावसायिक दूरध्वनी सेवेची सुरवात केली.
१८८७ : देशातील सर्वाधिक गर्दीचे स्टेशन व्हिक्टोरिया टर्मिनस (सध्याचे नाव सी. एस. टी.) सुरू झाले.
१८९९ : केंब्रिज विद्यापीठाच्या 'ट्रायपॉस' या गणिताच्या अंतिम परीक्षेत रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे पहिल्या वर्गात पहिले आल्यामुळे त्यांना सिनिअर रँग्लर होण्याचा बहुमान मिळाला.
१९२१ : टिळक महाराष्ट्र विद्यापीठाची स्थापना
१९६० : महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाची स्थापना
१९९० : ७.४ मेगावॅटचा भूकंपात इराण मध्ये ५०,००० लोक ठार तर १,५०,००० पर्यंत जखमी झाले.
१९९७ : 'महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी'तर्फे राज्यातील पहिली मुलींची सैनिकी शाळा पुण्याजवळ सुरू झाली.
२००१ : परवेझ मुशर्रफ पाकिस्तानचे राष्ट्राध्यक्ष झाले.
२०१४ : प्रसिद्ध कवी केदारनाथ सिंह यांना ज्ञानपीठ पुरस्कार घोषित करण्यात आला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८५६ : प्रसिद्ध ब्रिटीश व्यापारी व राजकारणी सर एडवर्ड अल्बर्ट ससून यांचा जन्मदिन.
१८६९ : लक्ष्मणराव किर्लोस्कर किर्लोस्कर उद्योगसमुहाचे संस्थापक (मृत्यू: २६ सप्टेंबर १९५६)
१८७६ : भारतीय तेलगु भाषिक चित्रपट क्षेत्राच्या इतिहासातील प्रसिद्ध पहिले गीतकार चांदला केसावदासू यांचा जन्मदिन.
१९१५ : टेरेन्स यंग चिनी-इंग्लिश दिग्दर्शक आणि पटकथाकार (मृत्यू: ७ सप्टेंबर १९९४)
१९२० : मनमोहन अधिकारी लोकशाही पद्धतीने निवडण्यात आलेले नेपाळचे पहिले पंतप्रधान, कम्युनिस्ट नेते (मृत्यू: २६ एप्रिल १९९९)
१९३९ : रमाकांत देसाई जलदगती गोलंदाज व राष्ट्रीय निवड समितीचे अध्यक्ष (मृत्यू: २८ एप्रिल १९९८)
१९४८ : नौरूचे राष्ट्राध्यक्ष लुडविग स्कॉटी यांचा जन्म.
१९५२ : भारतीय लेखक आणि कवी विक्रम सेठ यांचा जन्म.
१९५४ : ॲलन लॅम्ब इंग्लिश क्रिकेटपटू
१९७२ : पारस म्हांब्रे क्रिकेटपटू
१९७६ : प्रसिद्ध भारतीय महिला कसोटी व एकदिवसीय आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू देविका पळशीकर यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१६६८ : हेन्रिच रॉथ जर्मनीतील संस्कृत विद्वान आणि धर्मप्रसारक (जन्म: १८ डिसेंबर १६२०)
१८३७ : विल्यम (चौथा) इंग्लंडचा राजा (जन्म: २१ ऑगस्ट १७६५)
१९१७ : अमेरिकन रसायनशास्त्रज्ञ जेम्समेसन क्राफ्ट्स यांचे निधन.
१९३० : ब्रिटीश कालीन रामपूर रियासतचे नवाब हमीद अली खान बहादूर यांचे निधन.
१९७२ : साली प्रसिद्ध भारतीय भौतिकशास्त्रज्ञ प्रा. कोट्टरलाकोटा रंगधामा राव यांचे निधन.
१९८७ : जागतिक कीर्तीचे पक्षीतज्ञ, बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीचे एक संस्थापक पद्मभूषण डॉ. सलीम अली यांचे निधन. (जन्म: १२ नोव्हेंबर १८९६)
१९९७ : बासू भट्टाचार्य चित्रफट दिग्दर्शनाच्या पदार्पणातच राष्ट्रपती पुरस्कार मिळवणारे निर्माते व दिग्दर्शक (जन्म: १९३४)
१९९७ : वासुदेव वामन तथा 'भाऊसाहेब' पाटणकर ऊर्फ 'जिंदादिल' मराठीतले पहिले शायर (जन्म: ? ? १९०८)
२००७ : सुप्रसिद्ध भारतीय बंगाली चित्रपट अभिनेत्री अनिता गुहा यांचे निधन.
२००८ : चंद्रकांत गोखले अभिनेते (जन्म: ७ जानेवारी १९२१)
२००९ : पाकिस्तान देशाचे कीटकशास्त्रज्ञ, प्राध्यापक, अभिनेते आणि उद्योजक दतुक रहमान अन्वर सय्यद यांचे निधन.
२०१० : माजी भारतीय कसोटी क्रिकेटपटू गुंडीबाईल रामा सुंदराम यांचे निधन.
२०१३ : भारतीय पत्रकार डिकी रुतनागुर यांचे निधन. (जन्म: २६ फेब्रुवारी १९३१)
१९८७ : जागतिक कीर्तीचे पक्षीतज्ञ, बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीचे एक संस्थापक डॉ. सलीम अली यांचे निधन. (जन्म: १२ नोव्हेंबर १८९६)

# वेळीच करा हळद, आल्याची लागवड



साधारणपणे आले व हळद लागवडीला अक्षयतृतीयेला म्हणजेच मे महिन्यामध्ये सुरवात होते. मात्र, गतवर्षीच्या दुष्काळी वातावरणामुळे पाण्याची कमतरता असल्याने लागवडीला उशीर होत आहे. या पिकांच्या चांगल्या उगवणीसाठी ३५ ते ४० अंश सेल्सिअस तापमानाची आवश्यकता असते. त्यामुळे या पिकांची लागवड उशिरात उशिरा १५ ते २० जूनच्या दरम्यान करावी. त्यानंतर या पिकांची लागवड केल्यास उत्पादनात घट येते. लागवडीनंतर वातावरणात उष्णता असल्यास व हवामान कोरडे असल्यास सेंद्रिय आच्छादनाचा वापर करावा. नवीन रुजणाऱ्या कंदाच्या अंकुरास इजा पोचत नाही. कोंब-अंकुर करपण्याचा धोका टळतो.

या पिकांच्या उगवणीसाठी बियाण्याच्या सुप्तावस्थेच्या कालावधीनुसार ३ ते ४ आठवडे लागतात. त्यामुळे लागवडीपासून पहिल्या पंधरवड्यामध्ये ठिबक सिंचनाद्वारे कोणतीही खते देऊ नयेत. हळदीची लागवड योग्य खोलीवर करणे आवश्यक आहे. कंदावर दोन ते तीन इंच मातीचा थर येईल, असे पाहावे. शक्यतो लागवड करण्यापूर्वी शेतास पाणी देऊन वाफशावर या पिकांची लागवड करावी किंवा लागवडीनंतर लगेच पाणी द्यावे, अन्यथा कंद मलूल पडणे किंवा गाभळण्याचे प्रमाण वाढते. कंदकुजीचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता असते. दर्जेदार उत्पादनासाठी या पिकांमध्ये शेणखताचा वापर मोठ्या प्रमाणात होतो. त्यामुळे तणांचा प्रादुर्भावही अधिक प्रमाणात असतो. लागवडीनंतर लगेच दुसऱ्या किंवा तिसऱ्या दिवशी तण उगवण्यापूर्वी ॲट्रॉझीन हे तणनाशक ४ ते ५ ग्रॅम प्रति लिटर पाण्यामध्ये घेऊन फवारणी करावी. फवारणी करताना जमीन ओलसर असणे गरजेचे आहे. लव्हाळा किंवा हराळी अशी बहुवार्षिक तणे शेतात आढळून आल्यास, लागवडीनंतर १० ते १२ दिवसांनी तण उगवल्यानंतर आणि हळद उगवण्याच्या अगोदर ग्लायफोसेट (४१ टक्के) हे तणनाशक ४ ते ५ मि.लि. प्रति लिटर प्रमाणे फवारणी करावी.

हळद उगवण्यास सुरवात झाल्यानंतर किंवा लागवडीपासून पंधरा दिवसांनंतर कोणत्याही प्रकारच्या तणनाशकांचा वापर हळदीमध्ये करू नये. पारंपरिक पद्धतीने म्हणजेच सरी वरंब्यावर हळदीची लागवड केलेल्या क्षेत्रावर उगवण पूर्ण झाल्यावर खतांची दुसरी मात्रा द्यावी. यामध्ये एकरी ८० किलो युरिया आणि शिफारशीनुसार सूक्ष्म अन्नद्रव्यांचा वापर करावा. आले-हळदीमध्ये आंतरपिके घेताना पहिल्या चार महिन्यापर्यंत वाढ होतील अशा प्रकारची आंतरपिके निवडावीत. यामध्ये मिरची, झेंडू, घेवडा, सोयाबीन, तूर, एरंड इ. सारख्या आंतरपिकांचा समावेश असावा.

हळद व आले या पिकांमध्ये मका हे आंतरपीक घेऊ नये, त्यामुळे उत्पादनात घट येते. या पिकांवरील कंदकूज या रोगाच्या नियंत्रणासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून एकरी ट्रायकोडर्मा प्लस ३ किलो या प्रमाणात शेणखतात मिसळून किंवा द्रवरूप स्वरूपातील ठिबकच्या माध्यमातून द्यावा. ट्रायकोडर्मा देताना जमिनीत ओलावा असणे गरजेचे आहे.

# चाऱ्यासाठी लागवड केलेली ज्वारी वाढली तब्बल १६ फुट

पुणे : किर्तनकार त्यांच्या किर्तनाच्या माध्यमातून समाज प्रबोधन करतात हे आपल्या सर्वांना माहित तर आहेच. पण आपण अशा कीर्तनकार महाराजांबद्दल जाणून घेणार आहोत ज्यांनी जनावरांच्या चाऱ्यासाठी ज्वारीची लागवड केली आणि त्यांची ज्वारी चक्क १६ फुट उंच वाढलेली आहे. उदापूर गावचे भागवताचार्य समाज प्रबोधनकार ह.भ.प. गणेश महाराज शिंदे यांनी आपल्या वडिलोपार्जित एक एकर शेतीमध्ये अन्य फळभाजी पिकांना फाटा देत जनावरांच्या चाऱ्यासाठी मका व बेंद्रीचे (ज्वारी) पीक घेतले होते. त्यामधील बेंद्रीचे म्हणजेच ज्वारीचे पीक सध्या १५ कांड्याच्या स्थितीमध्ये असून, उसाएवढी जाडी व उंची तब्बल १६ फूट एवढी झाली आहे. त्यामुळे उदापूर पंचक्रोशीतील शेतकरी हे पीक पाहण्यासाठी भेट देत आहे.

वारकरी संप्रदायाचा वसा व वारसा घेऊन शिंदे महाराज हे संपूर्ण महाराष्ट्रामध्ये समाजप्रबोधन करत आहेत, तसेच गोवर्धनाचे संवर्धन करण्यासाठी त्यांनी पारनेर तालुक्यातील कान्हूर पठार येथे शेती घेऊन गोशाळा उभारली आहे. सध्या या गोशाळेमध्ये गावठी गाई, म्हैस, गावठी बैल, वासरे अशी जनावरे असल्यामुळे त्यांना चारा मिळावा यासाठी उदापूर येथील वडिलोपार्जित शेतीमध्ये फळभाज्यांमधून उत्पन्न घेण्यापेक्षा सतत मका व ज्वारी यांची लागवड करून मुक्या जनावरांच्या खाण्यापिण्याची सोय करत आहे. या शेतातील बेंद्रीच्या पिकाची उंची तब्बल १६ फुटांची झाली असल्यामुळे अनेक शेतकर्यांमध्ये हा कुतूहलाचा विषय बनला आहे. परिसरात पहिल्यांदाच पिकाची उंची एवढी मोठी झाल्याने पंचक्रोशीतील शेतकरीदेखील बेंद्रीचे पीक पाहण्यासाठी आवर्जून भेट देत आहेत.

अशी केली चारा पिकाची लागवड

शेतीमध्ये प्रथम सरी पाडून त्यामध्ये ट्रायल बेसिसवर मेघा स्वीट नावाच्या ज्वारीचे एक किलो बियाणे पेरले व बाकीच्या शेतीमध्ये मका पेरला. एकच कीटकनाशक फवारणी करून नंतर कुठलीही रासायनिक फवारणी न करता गोमूत्र व शेण खतावर भर दिला. एक एकरमध्ये साधारण पंचवीस हजार रुपये खर्च आला आहे. जनावरांच्या चाऱ्यासाठी अनेक शेतकरी एका सरीसाठी पाच हजार रुपये किंमत मोजायला तयार आहेत. अशा पंचवीस सरी उपलब्ध असल्यामुळे साधारण हा चारा विक्रीसाठी उपलब्ध केला तरी सव्वा लाखाचे उत्पन्न मिळेल, असे ह.भ.प. गणेश महाराज शिंदे यांनी सांगितले. समाज प्रबोधन सोबतच पशुप्रेम दाखवणारी कीर्तनकार ह.भ.प. गणेश महाराज शिंदे यांची कृती खरच बोध घेण्यासारखी आहे.



# नवीन फळबागेचे नियोजन कसे करावे ?

आपल्याकडे जमीन कोणत्या प्रकारची आहे?आपल्या जमिनीत फळझाडे येतील का?बारमाही पाण्याची व्यवस्था आपल्याकडे आहे का?आपल्या हवामानात फळझाडे कोणत्या प्रकारची येऊ शकतील? मातीची व पाण्याची तपासणी केली आहे काय?बागेसाठी उत्तम जातीवंत कलमे कोठून उपलब्ध होऊ शकतील?जी बाग आपण लावणार आहोत त्यास बाजारपेठ उपलब्ध आहे काय?प्रक्रिया उद्योग आहेत काय? अशा सर्व बाबींचा विचार केल्यानंतरच आपणास कोणती फळझाडे लावायला हवीत याचा विचार करणे महत्वाचे ठरते.

राज्यामध्ये सन १९९०-९१ पासून रोजगार हमी अंतर्गत १०० टक्के अनुदानित फळझाड लागवड हि महत्त्वाकांक्षी योजना सुरु झाली. तेंव्हा पासून फळबाग लागवडीची संकल्पना राज्यातील शेतकऱ्यांच्या मनावर रुजली. फळबाग लागवडीची संकल्पना राज्यातील पडीक जमिनीला मिळालेले वरदान ठरल, अस म्हटल तर वावग ठरू नये.राज्यात आता पर्यंत ३० लाख हेक्टरहून अधिक क्षेत्रावर फळबागा उभ्या आहेत. परंतु अद्याप फळबाग लागवडीमध्ये अपेक्षित असे यश मिळालेले नाही हि वस्तूस्थिती आहे. अशा परिस्थितीत फळबाग लागवड यशस्वी होण्यासाठी ''फळबाग लागवडीची पूर्वतयारी आणि नियोजन'' या महत्वाच्या बाबी आहेत.



**फळबागेच्या यशस्वी लागवडीकरिता महत्वाच्या बाबी कोणत्या?**

आपल्याकडे जमीन कोणत्या प्रकारची आहे?आपल्या जमिनीत फळझाडे येतील का?बारमाही पाण्याची व्यवस्था आपल्याकडे आहे का?आपल्या हवामानात फळझाडे कोणत्या प्रकारची येऊ शकतील? मातीची व पाण्याची तपासणी केली आहे काय?बागेसाठी उत्तम जातीवंत कलमे कोठून उपलब्ध होऊ शकतील?जी बाग आपण लावणार आहोत त्यास बाजारपेठ उपलब्ध आहे काय?प्रक्रिया उद्योग आहेत काय? अशा सर्व बाबींचा विचार केल्यानंतरच आपणास कोणती फळझाडे लावायला हवीत याचा विचार करणे महत्वाचे ठरते. फळबाग म्हणजे ५ ते ६ महिन्याच्या पिकांच्या मशागतीची गोष्ट नसते, तो एक दिर्घकाळ चालणारा व्यवसायाच म्हणायला हरकत नाही. एकदा त्यात पडले कि थांबुन चालत नाही. अनेक वर्ष सात्यत्याने व चिकाटीने बागेचे फलोत्पादन हाती येईपर्यंत कष्ट करावे लागतात. मेहनत घ्यावी लागते.घामही गाळावा लागतो. कधी कधी पैसा अपुरा पडतो,पाणी पुरत नाही.भावनेच्या भरात एखादी बाग करावयाची ठरविले जाते आणि मग धाडस निभाविता येत नाही.सगळा पसारा अर्ध्यावर सोडावा लागतो.त्यामुळे केलेल्या कष्टाची पैशाची, अनाठायी नासाडी होते. त्यामुळे फळबाग लागवड करण्यापूर्वी योग्य नियोजनांची नितांत आवश्यकता असते.

फळबागेसाठी जमिनीची निवड : आपली जमीन कोणत्या प्रकारची आहे, हलकी, मध्यम कि भारी हे सर्वांना परिचित असतेच.जर माहिती नसेल तर माहिती करून घ्यावी.जमिनीची खोली किती आहे? जमिनीच्या खाली मुरूम किती खोलीवर आहे? जमिनीचा निचरा कसा आहे? त्याचा अभ्यास करूनच फळबाग निवडावी.फळबागेसाठी जमिनीची निवड करताना तिचा निचरा उत्तम असणे आवश्यक आहे. फळबागेसाठी कमीत कमी १ मीटर खोलीनंतर मुरमाचा थर असणारी जमिन निवडावी. भरपूर सेंद्रिय कर्ब असणारी, भुसभुशीत,मध्यम पोताची जमिनीचा सामू ६ ते ७.५ पर्यंत असावा.मुक्त चुनखडीचे प्रमाण १० टक्क्यापेक्षा कमी असावे. जमिनीचा उतार २ ते ३ टक्क्यापेक्षा जास्त नसावा. ज्या ठिकाणी फळबाग लावायची आहे,त्या ठिकाणच्या मातीचे परिक्षण करून घेणे आवश्यक आहे.

फळबागेसाठी पाण्याची उपलब्धता : बागायती फळझाडांना नियमित पाणी द्यावे लागते,अशा बागायती फळझाडांची लागवड करताना कितपत पाणीपुरवठा पुरेल किंवा पाण्याची उपलब्धता किती आहे,याचा विचार करूनच नियोजन करावे.कोरडवाहू फळपिकांना लागवडीच्या सुरुवातीस पहिली तीन ते चार वर्ष पाण्याची,चांगल्या व समाधानकारक वाढीसाठी पाण्याची आवश्यकता असते.नारळ, सुपारी, केळी, पपई,चिकू मसाला पिके यांना इतर फळझाडांपेक्षा जास्त पाणी लागते.तसेच फळझाडांवरील कीड व रोगांच्या नियंत्रणाकरिता आवश्यक फवारणीसाठी पाण्याची आवश्यकता असते.म्हणून पाण्याच्या उपलब्धतेनुसार फळझाडांची निवड करावी. आपल्याकडे १२ महिने पाण्याची सोय असेल तर ज्या फळझाडांना बाराही महिने पाणी लागते अशा फळझाडांची निवड करावी.आपल्याला पाणी आठ महिने पुरत असेल तर पेरू सारखी फळझाडे लावावीत.आपले पाणी फक्त सहा महिने पुरत असेल तर सीताफळ, रामफळ, आवळा, बोर या सारखी कोरडवाहू फळझाडांची लागवड करावी.

हवामानानुसार फळपिकांची लागवड : महाराष्ट्रातील शेतकरी या बाबतीत खरोखरच भाग्यवान आहेत, कारण आपल्या राज्यात सफरचंद वगळता बहुतेक फळझाडांची यशस्वी लागवड करता येते. कारण आपल्या राज्यातील हवामान फळबाग लागवडीसाठी खुपच अनुकूल आहे.यामुळे हवामांनाच्या बाबतीत फळबाग लागवड करताना शेतकऱ्यांना फारसा विचार करावा लागत नाही.आपल्या राज्याचा विचार करता पश्चिम महाराष्ट्रात आंबा, केळी, चिकू, पपई, नारळ अशा प्रकारची फळझाडे घ्यावीत.पूर्वेकडील उष्ण व कोरड्या हवामानात संत्रा, मोसंबी, कागदी लिंबू, पेरू, द्राक्षे, डाळिंब यासारखी फळझाडे घ्यावीत.कोकणसारख्या अति पावसाच्या भागात चिकू, नारळ, फणस, आंबा काजू यासारखी फळझाडे घ्यावीत.अति कमी पावसाच्या भागात बोर, सीताफळ, आवळा, चिंच अशी

# कोळपे वस्तीवरील शाळेला मिळाली ईमारत

## १० वर्षांपासून शाळा भरवली जात होती पत्र्याच्या शेडमध्ये








लिंबागणेश । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील बेलगाव ग्रामपंचायत अंतर्गत अंदाजे १५० च्या आसपास लोकसंख्या ऊसतोड मजूर, शेतकरी असलेल्या मुलांसाठी जिल्हा परिषद शाळेसाठी ईमारत नव्हती.१० वर्षांपासून ग्रामस्थांनी उभारलेल्या पत्र्याच्या शेडमध्ये शाळा भरवली जात असे.मात्र पावसाळ्यात वादळीवाऱ्यासह पावसाने शालेय मुलांचे हाल होत होते.यासंबधी शाळेतील शिक्षक यांनी लोकप्रतिनिधी व सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी शासन दरबारी पाठपुरावा केल्यानंतर अखेर गेल्यावर्षी भाजपा जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून १० लाख रुपये दिल्यानंतर वस्तीवरील ग्रामस्थांनी ६ गुंठे जमीन दानपत्र करून दिल्यानंतर यावर्षी पत्र्याच्या शाळेतुन नविन इमारतीमध्ये शाळा भरण्यास सुरुवात झाली आहे.आणि अखेर कोळपे वस्तीवरील मुलांचा ईमारतीचा प्रश्न सुटला आहे.

सन २०१४ पासुन बेलगाव येथील वस्तीशाळेवर मी आणि सहशिक्षिका चंद्रकला सिरसट कार्यरत असुन सुरूवातीला पत्र्याच्या शेडमध्ये मुलांची सोय करण्यात आली होती.परंतु पावसाळ्यात मुलांचे जास्त हाल होत.याविषयी लोकप्रतिनिधी गावचे सरपंच व शिक्षण विभागाला शाळेच्या अडचणी विषयी कळवण्यात आले होते. लोकप्रतिनिधी आणि सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी शासनदरबारी व प्रसिद्धी माध्यमातुन मुलांच्या व्यथा मांडल्या.अखेर पत्र्याच्या शेडमधील मुलांना शाळा ईमारत मिळाली याचा मनस्वी आनंद होत आहे. बेलगाव येथील कोळपे वस्तीवरील विद्यार्थ्यांना पत्र्याच्या शेडमध्ये ज्ञानार्जन करावे लागत असुन शाळा इमारतीसाठी निधी द्यावा यासाठी तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड अजित पवार आणि शिक्षणाधिकारी (प्राथमिक) श्रीकांत कुलकर्णी यांना प्रत्यक्ष भेटून लेखी निवेदनाद्वारे मागणी केली होती. जिल्हा नियोजन निधीतून तरतूद करण्याचे आश्वासन दिले होते.बीड जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या २४७४ शाळा असुन यात २४१५ शाळा प्राथमिक तर ५९ शाळा माध्यमिक आहेत. लोकप्रतिनिधी व प्रशासनाचे दुर्लक्ष झाल्याने व निधी वेळेवर उपलब्ध होत नसल्याने ३४९ शाळांमधील ५९२ वर्गखोल्या अक्षरशः मोडकळीस आलेल्या धोकादायक आहेत तर ४६८ शाळांमधील ८५६ वरवगखोल्यांची दुरुस्ती तातडीने करणे आवश्यक आहे.जिल्ह्यातील ४६८ शाळांमधील ८५६ वर्गखोल्या दुरूस्ती साठी १५६ कोटी ६ लाख ६० हजार निधींची आवश्यकता आहे.वारंवार शासनाकडे निवेदन तसेच आंदोलनाद्वारे पाठपुरावा करत असुन धार्मिक स्थळांसाठी निधी तातडीने उपलब्ध करून देणाऱ्या लोकप्रतिनिधींना ज्ञान मंदिरासाठी निधी उपलब्ध करून देण्यास मात्र स्वारस्य दिसुन येत नाही.

### मस्केकडून इमारतीसाठी १० लाख

वस्तीशाळा शिक्षक निरा गर्जे, तत्कालीन सरपंच अश्विन शेळके, विद्यमान सरपंच अशोक शेळके, उपसरपंच सुखदेव कोळपे व वस्तीवरील ग्रामस्थांनी जिल्हा परिषद सदस्य तथा भाजपा जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांना वस्तीशाळेच्या इमारतीसाठी निधी मागितल्यानंतर गेल्यावर्षी राजेंद्र मस्के यांनी जिल्हा नियोजन आयोगाच्या निधीतून १० लाख रुपये उपलब्ध करून दिले. बेलेश्वर संस्थानचे मठाधिपती महंत महादेव भारती महाराज यांच्या शुभहस्ते राजेंद्र मस्के, मजुर फेडरेशनचे संचालक बद्रीनाथ जटाळ , डॉ.गणेश ढवळे, विस्तार अधिकारी श्रीधर शेळके, सरपंच अशोक जाधव, उपसरपंच सुखदेव कोळपे व ग्रामस्थांच्या उपस्थितीत नविन शाळा ईमारत बांकामाचे भुमिपुजन करण्यात आले होते.

### ग्रामस्थांनी ६ गुंठे जमीन शाळेसाठी दान

वस्तीवरील शालेय विद्यार्थ्यांची गैरसोय दूर व्हावी यासाठी वस्तीवरील कोंडीबा लक्ष्मण कोळपे,ईश्वर परमेश्वर कोळपे, सुभाष विठ्ठल कोळपे, ज्ञानोबा येडोबा कोळपे यांनी एकत्रितपणे ६ गुंठे जागा शाळेसाठी दान दिली आहे.त्यावर वर्षभरात नविन ईमारत बांधण्यात आली असुन ग्रामपंचायतने शाळेसाठी बोअरवेल व पिण्याच्या पाण्याच्या टाकीची सोय केली आहे. यासाठी माजी सरपंच अश्विन शेळके, विद्यमान सरपंच अशोक शेळके आणि ग्रामस्थांचे सहकार्य लाभले आहे.

## थोडक्यात



### औरंगपूर येथे शाळापूर्व तयारी मेळावा

बीड –जिल्हा परिषद प्राथमिक शाळा औरंगपूर केंद्र हिवर सिंगा तालुका शिरूर कासार जिल्हा बीड या शाळेमध्ये शाळा पूर्व तयारी मेळावा दिनांक १९ जून रोजी साजरा करण्यात आला शाळेत प्रवेशित नवागतांचे शाळेच्या वतीने हार व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले कार्यक्रमासाठी शाळेतील सर्व विद्यार्थी उपस्थित होते त्याचप्रमाणे ग्रामस्थ श्रीम.पवळ उषा,छाया जाधव उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक दैवशाला भोंडवे ह्यांनी केले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक द. ल.वारे हे उपस्थित होते.

### श्याम महाराज नेरकर यांची किर्तन सेवा संपन्न



बीड – पेठ बीड भागातील संस्थान विठ्ठल मंदिर येथे बुधवार दि.१२ पासून असलेल्या अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज श्रीज्ञानेश्वरी पारायण सोहळा उत्साह, भक्तीमय वातावरणात संपन्न होत असून या नामसप्ताह दरम्यान मंगळवार दि.१८ रोजी ह. भ. प. श्याम महाराज नेरकर यांची रसाळ वाणीतून किर्तन सेवा संपन्न झाली. याप्रसंगी महिला, पुरुष भाविकभक्तांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

### लाभार्थी लाभा पासुन राहणार वंचीत- शेख



पाटोदा- पाटोदा तहसील अंतर्गत श्रावणबाळ व संजय गांधी योजनेतील लाभार्थींना आधार कार्डला मोबाईल लिंक करण्यासाठी सुचना दिल्या असुन बऱ्याच वयोवृध्द व दिव्यांग व्यक्तीचे हाताचे ठसे उमटत नसल्यामुळे सदरील लाभार्थी हे या योजने पासुन वंचीत राहण्याची दाट शक्यता आहे. मा.तहसीलदार यांनी या सर्व बाबीचा विचार करावा व शासनाकडे या गंभीर बाबीची माहिती दयावी व संजय गांधी,श्रावणबाळ योजनेचे लाभार्थी वंचीत राहू नयेत याची दक्षता घ्यावी नसता दिव्यांग संघर्ष समिती महाराष्ट्र च्या वतीने सर्व लाभार्थींना सोबत घेऊन पाटोदा तहसील कार्यालया समोर योग्य प्रकारचे आंदोलन करण्यात येईल असे प्रसिद्धी पत्रकता दिव्यांग संघर्ष समिती महाराष्ट्र चे अध्यक्ष जीलानी शेख , जिल्हाध्यक्ष आलम शेख , तालुका अध्यक्ष अशोक दगडखैर , वैभव देशमुख, संतोष राख ,हानुमंत काळूशे, ईश्वर आमटे, बजरंग लांडगे , ईश्वर माने , व इतर सर्व लाभार्थी यांनी म्हटले आहे

## अंबाजोगाईच्या शासकीय संमिश्र केंद्रात दिव्यांग विद्यार्थ्यांचे प्रवेश सुरू

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंध, मूकबधिर व अस्थिव्यंग प्रवर्गातील दिव्यांग विद्यार्थ्यां साठी मिश्र गट संकुल असलेल्या अंबाजोगाई येथील शासकीय बहुउद्देशीय संमिश्र दिव्यांग केंद्रात इयत्ता पहिली ते दहावी पर्यंतचे प्रवेश घेऊन दिव्यांग विद्यार्थ्यांचे भवितव्य उज्वल घडवावे. असे आवाहन अधीक्षक (वर्ग २) श्रीम. आर एस . मोरे यांनी केले आहे. अंबाजोगाई येथील शासकीय बहुउद्देशीय संमिश्र दिव्यांग केंद्र हे शासकीय संस्था १९७५ साली स्थापन झालेली असून अंध, मूकबधिर व अस्थिव्यंग या तिन्ही प्रवर्गातील दिव्यांग विद्यार्थ्यांना एकाच छताखाली विशेष शिक्षण व एकात्म शिक्षण देणारी मराठवाड्यातील संमिश्र स्वरूपाची म्हणजेच मिश्रगट संकुल असणारी निवासी एकमेव शासकीय संस्था आहे.

या संस्थेत वरील तिन्ही प्रवर्गातील दिव्यांग मुलांना विशेष शिक्षण, एकात्म शिक्षण देऊन त्यांच्या पुनर्वसनाची देखील काळजी घेतली जाते. त्याचबरोबर डिजिटल शिक्षण, वसती गृहातील परिपूर्ण सुविधा, प्रवेशित मुलांचा सर्वांगीण विकास याबाबतीत विशेष लक्ष दिले जाते. भौतिक उपचार, व्यवसाय उपचार, समाज उपचार, वैद्यकीय उपचार, आवश्यक ते समुपदेशन आदी सुविधा या संमिश्र केंद्रामार्फत प्रवेशार्थी दिव्यांगांना दिल्या जातात.

वय वर्ष १८ पर्यंत या शासकीय दिव्यांग संस्थेत अंध ,मूकबधिर व अस्थिव्यंग अशा तिन्ही प्रवर्गातील मुलांना शिक्षण व वसती गृहासाठी प्रवेश दिला जातो. ही शासकीय संस्था असल्याने प्रवेशार्थींना सर्व सुविधा मोफत मिळतात. अंबाजोगाई चा शासकीय बहुउद्देशीय संमिश्र दिव्यांग केंद्राला दिव्यांग शिक्षणाचा चांगला इतिहास, मोठा वारसा आणि यशाची परंपरा असल्याने संस्थेने नावलौकिक प्राप्त केलेले आहे.

चालू शैक्षणिक वर्षासाठी इयत्ता पहिली ते दहावी प्रवेश प्रक्रिया सुरू असून या शासकीय दिव्यांग संस्थेचा अर्थातच संमिश्र केंद्राचा मराठवाड्यातील दिव्यांग विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त प्रवेश घेऊन आपल्या शिक्षण व पुनर्वसनाचा मार्ग सुकर करावा असे आवाहन संस्थेच्या वतीने अधीक्षक श्रीमती आर एस मोरे यांनी केले आहे.

## जागतिक योग दिनानिमित्त आयुष विभागाचा अभिनव उपक्रम

धारूर । प्रतिनिधी

विशेष योग सत्राचे आयोजन व ग्रामीण रुग्णालय परिसरात१००००वृक्षारोपण सह ग्रामीण रुग्णालय धारूर येथे जागतिक योग दिनानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन दिनांक २१/०६/ २०२४ रोजी करण्यात आले आहे .

आयुष विभाग, ग्रामिण रुग्णालय धारूर आणि १३६ ईको बटालियन भारतीय सेना यांच्या संयुक्त विद्यमाने २१ जून रोजी सकाळी ७:३० वाजता ग्रामिण रुग्णालयात एक विशेष योग सत्र आयोजित करण्यात आले आहे. या सत्राचा मुख्य उद्देश योग विषयी जागृती निर्माण करणे व नागरिकांना योगाचे महत्त्व पटवून देणे हा आहे. त्या सोबतच पर्यावरण जागरुकते करिता व रम्य वातावरण निर्मिती करिता ग्रामिण रुणालयाच्या आवरातील मोकळ्या जागेत १०००० वृक्षारोपण १३६ इको बटालियन यांच्या सहकार्याने केले जाणार असून त्याची पूर्वतयारी सह परिसर सज्ज करण्यात आला आहे. सदर संपूर्ण कार्यक्रमाकरिता भारतीय सेनेची १३६ इको बटालियन सक्रिय पणे हजर राहणार आहे. तसेच शहरातील व परिसरातील नागरिकांनी या योग शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉक्टर शशांक वाघमारे यांनी केले आहे.

## विधानसभा निवडणूकच्या जाहीरनाम्यासाठी मुद्दे सुचवावेत–प्रा.ईश्वर मुंडे

धारूर / प्रतिनिधी

लोकसभा निवडणूक २०२४ मध्ये महाविकास आघाडीला महाराष्ट्रातील जनतेने चांगले बहूमत दिलेले आहे.या मुळे महा विकास आघाडीच्या वतीने महाराष्ट्रातील जनतेचे आभार मानन्यात येत आहे आगामी विधानसभा निवडणूक २०२४ महाविकास आघाडी जोमाने लढवणार आहे. लोकशाहीतील निवडणूका धर्म,जाती पातीवर नाही तर पक्षाचे ध्येय धोरणे व पक्षाच्या जाहीरनाम्यातील मुद्द्यांवर होणे अपेक्षीत असते.

म्हणून विधानसभा मतदार संघ निहाय जनतेच्या प्रश्नांशी निगडीत जाहीरनामा आसणे आवश्यक आहे. करीता राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष खा.शरदचंद्र पवार, प्रदेशाध्यक्ष, आ.जयंतराव पाटील, अध्यक्ष, जाहीरनामा समिती, माजी खासदार वंदना चव्हाण यांच्या सुचनेवरून मतदार संघ व तालुकानिहाय प्रश्नांची यादी सामाजिक संघटना,सामाजिक कार्यकर्त्ये व सर्व सामान्य जनतेकडून मागवण्यात येत आहे. त्या वरून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आगामी विधानसभा निवडणूक २०२४ पक्षाचा जाहीरनामा तयार करणार आहे तरी आपण विधानसभा निहाय प्रश्नांची यादी कळवावी. असे अवाहन प्रा.ईश्वर मुंडे, राज्य प्रमुख सेवा निवृत्त अधिकारी–कर्मचारी सेल महाराष्ट्र राज्य (९०९६६८८३६५)यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

## व्यंगचित्रकला हे जीवनात प्रगती करण्यासाठी एक उत्तम माध्यम –सुहास पालीमकर




बीड । प्रतिनिधी

बीड येथील विश्वविक्रमी व्यंगचित्रकार आयुर मंगल मूकबधिर विद्यालय बीड येथील कलाशिक्षक सुहास पालीमकर यांचे बीड येथील पोद्दार इंटरनॅशनल इंग्लिश स्कूल जालना रोड येथे व्यंगचित्र माध्यम यासंदर्भात विद्यार्थी व शिक्षक यांना मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी पालीमकर यांनी सांगितले की विद्यार्थ्यांनी डॉक्टर, इंजिनियर या क्षेत्राचा आग्रह न धरता चित्रकला आणि व्यंगचित्र कला माध्यमातून उन्नती, प्रगती साधावी यासाठी एक क्षेत्र उत्तम आहे.व्यंगचित्रकलेत कार्टून, कॉमिक्स आणि कॅरिकेचर या तीन प्रकार आहेत. कार्टून म्हणजे व्यंगात्मक चित्र पद्धतीतून समाज जागृती, कॉमिक्स म्हणजे संवाद चित्र यात अनेक व्यंगचित्रांची स्टिप काढून त्याद्वारे गोष्ट विचार प्रगट करता येतात व कॅरीकेचर पद्धतीत एखाद्या व्यक्तीचे व्यंगात्मक चित्र त्याद्वारे त्याचे कार्य स्वभाव प्रगट केला जातो.त्यासाठी व्यंगचित्रात या तीन ‘‘क‘‘ ला अनन्यसाधारण महत्त्व आहे. कार्टून, कॉमिक्स व कॅरिकेचर. यावेळी पालीमकर यांनी वरील तीनही पद्धतीचे प्रात्यक्षिक दाखवून मार्गदर्शन केले.

या कार्यक्रम प्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक गणेश काकडे यांनी प्रार्थनेवेळी सत्कार केला. मार्गदर्शनाच्या वेळी उपमुख्याध्यापिका वर्षा नागदे, सीईओ साजिद खान, कलाशिक्षक सोमनाथ कागदे, मनीषा परसे या सर्व कर्मचारी वर्ग व विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी पालीमकर सर यांची मुलाखत विद्यार्थिनी मृदिनी निकम, विद्यार्थी अरब निकम यांनी घेतली.

## स्वत:च्या क्षमता ओळखून त्यानुसार शैक्षणिक क्षेत्राची निवड करावी

### शनी मंदिर देवस्थानच्या वतीने गुणवंतांचा गौरव करताना मान्यवरांचे प्रतिपादन



बीड । प्रतिनिधी

विद्यार्थ्यांनी दहावी, बारावीच्या गुणांच्या टक्केवारीवर न जाता आपल्या स्वतःच्या आतील क्षमता ओळखल्या पाहिजेत आणि त्या क्षमता ओळखूनच काय व्हायचं ते क्षेत्र निवडलं पाहिजे. फक्त डॉक्टर आणि इंजिनियर हे दोनच क्षेत्र नाहीत. या व्यतिरिक्त हजारो क्षेत्र उपलब्ध आहेत त्यांचाही विद्यार्थ्यांनी नक्की विचार करावा. मोठं होत असताना आपल्या आई वडीलाना कायम नजरेसमोर ठेवावं, चांगल्या मित्र–मैत्रिणींची संगत धरावी. जीवनामध्ये अशक्य काहीच नाही फक्त मनाचं धैर्य आणि जिद्द असावी लागते. अभ्यासाबरोबर स्वतःच्या शरीराच्या आरोग्याकडेही लक्ष द्यावे असा काहीसा गुणवंतांच्या गुणगौरव समारंभात बोलताना मान्यवरांच्या बोलण्यातील रोख दिसून आला.

संपूर्ण भारत देशामध्ये सुप्रसिद्ध असणारे शनी देवाच्या साडेतीन पिठापैकी अर्धशक्तीपीठ असणारे बीड शहराचे सांस्कृतिक, ऐतिहासिक व धार्मिक वैभव श्री क्षेत्र शनी देवस्थानच्या वतीने वैद्यकीय प्रवेश पूर्व परीक्षा नीट, इयत्ता बारावी, इयत्ता दहावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा संपन्न झाला. विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र, पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष दैनिक चंपावतीपत्रचे संपादक जेष्ठ पत्रकार नामदेवरावजी क्षीरसागर, प्रमुख पाहुणे जगद्गुरु संत तुकाराम महाराज मंदिराचे संस्थापक प्राचार्य परशुराम महाराज मराडे, संपादक तथा उद्योजक विजयराज बंब, दत्ताजी देशमुख, कीर्तनकार त्रिंबक महाराज मातकर इ. उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमाच्या सुरुवातीला छत्रपती शिवाजी महाराज व शनी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर सामूहिक जिजाऊ वंदना, देवस्थान समितीच्या वतीने उपस्थित मान्यवरांचे स्वागत व स्वागतानंतर मान्यवरांचे उद्बोधक मनोगत संपन्न झाले.त्यानंतर विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. नीट परीक्षेमध्ये उत्तम गुण मिळवणारे पवन धांडे, प्राजक्ता घुमरे, राज थापडे, ऋषिकेश राहाडे यांचा, त्याचप्रमाणे बारावीमध्ये उत्तम गुण घेणाऱ्या तसेच इयत्ता दहावी परीक्षेमध्ये प्रत्येक शाळेतून गुणवंत ठरलेल्या प्रत्येकी दहा विद्यार्थ्यांचा संस्थांनच्या वतीने गौरव करण्यात आला. कार्यक्रमासाठी पत्रकार भागवत तावरे, सुनील क्षीरसागर, राजेश बंब, शरद चव्हाण, सार्थक जोशी यांच्यासह मोठ्या संख्येने पालक, शनिभक्त व बीड शहरातील व ग्रामीण भागातील नागरिक उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री क्षेत्र शनी देवस्थानचे अध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते रामनाथ भाऊ खोड, गणेश मस्के, श्रीकृष्ण महाराज उबाळे, संतोष महाराज डोंगरे, सुशील जटाळ, आदित्य पाणगुडे यांनी विशेष मेहनत घेतली.

# करियरचा विचार करताना युवकांनी आपल्या आवडीचे क्षेत्र निवडावे -आमदार नमिता मुंदडा

## छत्रपती शाहू महाराज युवाशक्ती करिअर शिबिरामध्ये युवकांना मार्गदर्शन करताना नमिता मुंदडा यांचा सल्ला

अंबाजोगाई प्रतिनिधी

माझे वडील अभियंते असल्यामुळे घरामध्ये सर्वांचीच इच्छा होती की मीही अभियंता व्हावे परंतु मला मात्र माझ्या आवडीच्या क्षेत्रामध्ये काम करायचं होतं. त्यामुळे मी आर्किटेक्ट व्हायचा निर्णय घेतला. युवकांनी आपल्या करिअरचा विचार करत असताना स्वतःला आवडणाऱ्या क्षेत्रांमध्ये करिअर करावे असा सल्ला केज मतदार संघाच्या आमदार सौ नमिता ताई मुंदडा यांनी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था अंबाजोगाई व केज यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या छत्रपती शाहू महाराज युवाशक्ती करिअर शिबिरामध्ये युवक युवतींना दिला. कार्यक्रमाचे प्रारंभी कौशल्य रोजगार उद्योजकता आणि नाविन्यता विभाग महाराष्ट्र राज्य तसेच शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था अंबाजोगाई



व केजच्या वतीने युवकांसाठी करियर शिबिरा निमित्त पोस्टर प्रदर्शनी आयोजित करण्यात आली होती. या प्रदर्शनीचे उद्घाटन आमदार सौ नमिता ताई मुंदडा यांच्या हस्ते संपन्न झाले. व्यासपीठावर राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करून युवाशक्ती करिअर शिबिराला प्रारंभ करण्यात आला. याप्रसंगी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी श्री औताडे पी जे यांची उपस्थिती होती. छत्रपती शाहू महाराज युवाशक्ती करिअर शिबिर उद्घाटन प्रसंगी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था अंबाजोगाई व केज यांच्या वतीने प्राचार्य मुने पी टी व प्राचार्य पवार के जे यांनी सर्व अतिथींचे स्वागत केले. या शिबिराच्या निमित्ताने इयत्ता दहावी बारावीनंतर शिक्षणाच्या विविध संधी या विषयावर डॉ.रघुनाथ जोगदंड, व्यक्तिमत्व विकास या विषयावर ब्रिलियंट अकॅडमी चे संचालक प्राध्यापक हनुमंत भोसले, यशस्वी उद्योजक होण्याचा मंत्र शैक्षणिक व रोजगार कर्ज योजना या विषयावर करियर मार्गदर्शक एडवोकेट संदीप थोरात, झिरो मेडिटेशन या विषयावर स्वाराती वैद्यकीय महाविद्यालयातील सहाय्यक प्राध्यापक डॉक्टर प्रशांत दहिरे तसेच समाज प्रबोधन या विषयावर सामाजिक कार्यकर्ते विकास पाथरीकर यांनी युवक युवतींना उत्तम मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी अवताडे सर यांनी आपल्या प्रास्ताविकामध्ये या शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रातील करिअरच्या संधी उपलब्ध होणार असून याचा सर्व विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रकाश बोरगावकर यांनी केले तर आभार प्राचार्य पवार सर यांनी मांनले. कौशल्य रोजगार उद्योजकता आणि नावीन्यता विभाग महाराष्ट्र राज्य तसेच शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था अंबाजोगाई व केज यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या छत्रपती शाहू महाराज युवाशक्ती करिअर शिबिराच्या आयोजनासाठी शिंपले सर लोमटे सर वैरागे सर बर्गे सर निलेश सर मैत्री सर होळीकर सर शिंदे सर वाघमारे सर श्रीमती खिल्लारे मॅडम श्रीमती देशपांडे मॅडम साबळे सर पोटपल्लेवार सर त्याचप्रमाणे समस्त कर्मचारी व शिल्प निदेशक यांनी विशेष परिश्रम घेतले.

# बोराडे, पानसबळ, शिंदे, मोमीन यांची चौकशी सुरु!

**बीड । प्रतिनिधी**

बीडचा सार्वजनिक बांधकाम विभाग म्हणजे आंधळं दळतय आणि कुत्र पीठ खातय असा झाला आहे. बीड व शिरूर तालुक्यातील एफ डि आर च्या कामांची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी चौकशी करण्याचे आदेश दिले, मात्र दिन वर्ष अधिकाऱ्यांनी हे प्रकरण लांबवले.मात्र काही दिवसापूर्वी या प्रकारणाची पुन्हा चौकशी सुरु झाल्याने अधिकाऱ्यांचे धाबे दनाणले आहेत.

बीडच्या सार्वजनिक बांधकाम विभागात गुत्तेदार आणि अधिकाऱ्यांनी बोगस कामांचा सपाटा लावला आहे. पूर किंवा नैसर्गिक आपत्ती आल्यास रस्ते, पूल, नाल्या यांचे होणारे नुकसान दुरुस्त करण्यासाठी सरकारकडून एफ डि आर च्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात निधी दिला जातो. बीड बांधकाम विभागाला देखील दरवर्षी मोठ्या प्रमाणात निधी येतो. मात्र कार्यकारी अभियंता ते शाखा अभियंता आणि गुत्तेदार मंडळी बोगस कामे दाखवून करोडो रुपयांचा निधी फस्त करतात.

२०२१-२२ या वर्षात बीड आणि शिरूर विभागात बोराडे, शिंदे, मोमीन, पानसंबळ यांच्यासह अनेक अधिकाऱ्यांनी आपल्या जवळच्या गुत्तेदारना कामे दिल्याचे दाखवले आणि कोट्यावधी रुपये हडप केले. याबाबत थेट मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे तक्रार झाली. त्यानंतर जे दोषी आहेत, त्यांच्याकडेच चौकशी देण्यात आली.

याबाबत ओरड झाल्यानंतर अधिकाऱ्यांनी कसेबसे हे प्रकरण मॅनेज केले. मात्र नुकतेच या प्रकरणात नांदेड येथील कार्यकारी अभियंता मुळे यांच्यासह अधिकाऱ्यांचे पथक चौकशीसाठी येऊन गेले. या प्रकरणात उपकार्यकारी अभियंता चंद्रकांत बोराडे, पानसंबलं यांचा मोठा हिस्सा असल्याची चर्चा आहे. शासन स्तरावरून याबाबत कठोर कारवाई केली जाण्याची शक्यता आहे.



**बीड : जिल्हाधिकारी दिपा मुधोळ मुंडे यांनी आज चौसाळा आणि लगतच्या आपल्या दौऱ्यात काही खत आणि बियाणे दुकानाना भेट ५ केली. खत आणि बियाणे योग्य दराने विक्री होत असल्याबद्दल ही तपासणी होती. त्यांनी या भेटीदरम्यान शेततळ्यांची देखील पाहणी केली. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी बाबासाहेब जेऊरकर यावेळी या दौऱ्यात सोबत होते.**

# गेवराईत दहाव्या आंतरराष्ट्रीय योग दिनाचे आयोजन

**गेवराई । प्रतिनिधी**

जागतिक योग दिनानिमित्ताने पतंजली योग समिती,आर. बी . अट्टल महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षी विविध प्रकारचे उपक्रम राबविले जातात . याही वर्षी २१ जून २०२४ रोजी येथील आर बी अट्टल महाविद्यालयाच्या क्रीडा सभागृहात सकाळी ७ वाजता योगदिना निमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे . प्राचार्या प्रोफेसर डॉ रजनी शिखरे यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या कार्यक्रमास पतंजली योग समितीचे अध्यक्ष प्रा राजेंद्र बरकसे , महाराष्ट्र योगशिक्षक महासंघाचे अध्यक्ष अरुण परदेशी , महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा . चंद्रकांत पुरी आदीची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे . यावेळी छत्रपती संभाजीनगरचे योग अभ्यासक राहूल पानखडे मार्गदर्शन करणार आहेत . आर बी अट्टल महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग , राष्ट्रीय छान सेना व क्रीडा विभाग यांच्या सहकार्याने आयोजित योग कार्यक्रमास विद्यार्थी व शहरातील नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे .




# संविधान साक्षरतेचा विस्तार व्हायला हवा -मुक्ता पाडूळे

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

संविधान साक्षरतेचे कार्य करतांना मी अनेक लोकांच्या भेटी घेतल्या. तेव्हा लक्षात आले की बहुसंख्य लोकांना आपल्या हक्कांची व अधिकारांची माहिती नाही. त्यांच्याकडे संविधानाचे पुस्तक नाही. अशा लोकांना संविधान सांगणे आवश्यक आहे. त्यातून त्यांना संविधानाची ताकद कळेल. मुलांना संविधान कळावे यासाठी संविधान कट्टा , संविधान शाळा , उद्देशिका ओळख असे उपक्रम राबविणे आवश्यक आहे. अशा उपक्रमातून संविधान मूल्यांची




पेरणी होईल. असे उपक्रम राबविण्यासाठी तरुणांनी यात सहभागी व्हायला हवे. त्यांनी संविधान वाड्या-वस्त्यात व गावा-गावात न्यायला हवे. तरुणांच्या कृतीशील पुढाकारातून सर्वत्र संविधान साक्षरतेचा विस्तार व्हायला हवा ! असे विचार संविधान प्रचारक मुक्ताताई पाडूळे यांनी व्यक्त केले आहेत. डॉ बाबासाहेब आंबेडकर भवन संघर्षभूमी ◀◀ पान ३ वर

# पोहण्यास गेलेल्या युवकाचा मृत्यू

**परळी । प्रतिनिधी**

परळीजवळील भोपला तलावात पोहायाला गेलेला एक युवक बुडाला असुन शोधकार्य सुरु करण्यात आले आहे. ही घटना बुधवार दि १९ रोजी सकाळी ९ च्या सुमारास घडली. दरम्यान, युवक तलावात बुडाल्याच्या घटनेने खळबळ उडाली असुन परिसरातील नागरिक तलावावर जमा झाले आहेत.

परळी-अंबाजोगाई रस्त्यावरील भोपला येथील तलावात एक युवक पाण्यात बुडाला आहे.बुधवार दि १९ रोजी सकाळी ९ च्या सुमारास कान्हेरवाडी येथील काही युवक भोपला येथील तलावावर पोहण्यासाठी गेले होते. यातील गणेश माणिकराव फड (वय २०) हा युवक पाण्याच्या प्रवाह आणि खोली लक्ष्यात न आल्याने तलावात बुडाला आहे. त्याचा शोध घेण्याचे काम सुरु आहे. परळी नगर पालिकेच्या अग्निशमन पथक शोध घेण्याचे काम करत आहे.

# शक्तिपीठ महामार्ग रद्द करण्याच्या मागणीसाठी अंबाजोगाईत निदर्शने

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

शक्तिपीठ महामार्ग रद्द करण्याच्या मागणीसाठी बीड जिल्ह्याच्या अंबाजोगाई शहरातील उपजिल्हाधिकारी कार्यालयासमोर शेतकऱ्यांनी धरणे, निदर्शने करत मागण्यांचे निवेदन दिले आहे.




मराठवाड्यातील बाधित शेतजमीन ही अनेक सिंचन कालवे, , नद्या, विहीरी, तलावाअंतर्गत कायमस्वरूपी बागायती आहे व सुपीक आहे व त्यामुळे हजारो कुटुंबाचा उदरनिर्वाह या बाधित जमिनीवरच अवलंबून आहे व या महामार्गामुळे ही सर्व नैसर्गिक किंवा कृत्रिम साधन संपत्ती नष्ट होणारी आहे व महामार्ग सोडून राहिलेली उर्वरित हजारो हेक्टर जमीन ही पाण्याअभावी नापीक किंवा दुष्काळी होणारी आहे. यासह अन्य कारणासाठी हा शक्तीपीठ महामार्ग रद्द करण्याची मागणी आज राज्यात सुरू असून याचाच भाग म्हणून आज अंबाजोगाई शहरातील उपजिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे, निदर्शने करून उपजिल्हाधिकारी यांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले आहे. यावेळी अखिल भारतीय किसान सभा बीड जिल्हाअध्यक्ष कॉ अजय बुरांडे, ॲड शिंदे,रवींद्र देवरवाडे यांच्यासह गित्ता ,सायगाव, नांदगाव, चाडगाव, मोटेगाव, मोरवड,भोकरंबां, आदि गावचे बाधित शेतकरी सहभागी झाले होते.

# डॉक्टरचे दोन लाख रुपये हिसकावून चोरटे पसार

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

बँकेतून दोन लाखांची रक्कम काढून दुचाकीवरून घराकडे निघालेल्या डॉक्टरची हँडलला अडकवलेली पैशाची बॅग हिसकावून चोरट्यांनी पोबारा केल्याची घटना मंगळवारी सकाळी अंबाजोगाई शहरात घडली.

अधिक माहिती अशी की, शरद बाळासाहेब जगताप (रा. जैन गल्ली, अंबाजोगाई) हे पशू चिकित्सक आहेत. गावकडे शेड बांधणे आणि लेब्रचे पेमेंट करण्यासाठी त्यांनी मंगळवारी सकाळी अंबाजोगाई पीपल्स बँकेतून २ लाख ५ हजार रुपये काढले. ही रक्कम त्यांनी एका कापडी पिशवीत ठेवली आणिदुचाकीचा हँडलला अडकवून ते शेतगड्यासह घराकडे निघाले. ते सन्मती पतसंस्थेच्या समोर आले असता दुचाकीवरून पाठलाग करणाऱ्या दोन चोरट्यांनी गाडी वळवून समोरून येत त्यांच्या दुचाकीला धक्का दिला आणि हँडलला अडकवलेली पैशाची बॅग घेऊन ते कुत्तर विहीर रोडने पसार झाले. याप्रकरणी शरद जगताप यांच्या फिर्यादीवरून अंबाजोगाई शहर ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला.

# मयताच्या खात्याची केवायसी करुन चक्क एस.बी.आय बँकेतुन उचलले ९८ हजार रुपये

**मयताच्या पत्नीच्या तक्रारी नंतर मयताच्या खात्यात ४९ हजार जमा**

**माजलगाव मधील स्टेट बँक ऑफ इंडिया बँकेतील महाप्रताप**

**माजलगाव । प्रतिनिधी**

मयताच्या नावे असलेल्या खात्यावरील रकमेची केवायसी करुन नवीन खाते पुस्तिका घेऊन दि १४ जुन रोजी ९८ हजार रुपये उचल्याची धक्कादायक घटना घडली असुन याप्रकरणी तक्रार दिल्यानंतर दि १९ जुन बुधवार रोजी परत ४९ हाजार जमा केल्याची घटना माजलगाव शहरातील हानुमान चौकातील स्टेट बँक ऑफ इंडियाच्या शाखेत घडली आहे.



याबाबत मिळालेली माहिती अशी की माजलगाव तालुक्यातील केसापुरी येथील तक्रारदार तथा मयताची पत्नी वेणुबाई व्यंकटराव साबळे यांनी शहरातील पोस्ट कार्यालयाच्या बाजुला असलेल्या स्टेट बँक ऑफ इंडियाच्या शाखा व्यवस्थापक यांना दिलेल्या तक्रारीत असे म्हटले आहे की,माझे पती नामे व्यंकटराव पि.विठ्ठलराव साबळे हे दिनांक २४ जानेवारी २०२१ रोजी मयत झालेले असुन त्यांना वारस म्हणून मी पत्नी व मुली नामे विद्या अरूण राऊत,वर्षा बालासाहेब फपाळ व विना विनायक काठेवाडे या कायदेशीर वारस आसुन माझे मयत पती व्यंकटराव साबळे यांचे स्टेट बँक ऑफ इंडीया शाखा पोस्ट ऑफिस जवळ माजलगाव येथे खाते क्र. ३१३५०८३९१७२ हे बचत खाते असुन सदरील खात्यावर आमचे परस्पर अज्ञात व्यक्तीकडून केवायसी करण्यात आली व नंतर दोन वेळा ४९,०००/- हजार रूपया प्रमाणे ◀◀ पान ३ वर

# रमाई आवास घरकुल व मोदी आवास घरकुलसाठी शासन जीआर नुसार वाळु तात्काळ द्यावी -नईम आत्तार

**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील शहर व ग्रामीण भागात वाळु ढिगारे अनाधिकृतपणे साठवलेले आहे ते जप्त करुन रमाई आवास योजना व मोदी आवास योजनाच्या घरकुल धारकास तात्काळ द्यावी

अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया चे अल्पसंख्याक बीड जिल्हा सरचिटणीस नईम करीम आतार यांनी माजलगाव तहसीलदार यांच्याकडे निवेदन द्वारे मागणी केली शासन जीआर नुसार तात्काळ रमाई घरकुल व मोदी आवास घरकुल या योजनेसाठी ग्रामीण भागातील मंजूर झालेले




रमाई घरकुल योजना व मोदी आवाज घरकुल योजनांच्या गोरगरीब लोकांना वाळू घर बाधकामसाठी मिळत नाही तात्काळ देण्यात यावी परंतु अवैधरित्या अंदाजे सहा ते सात हजार रुपये ब्रास ने वाळु माफिया विक्री करत आहे

माजलगाव तालुक्यातील अनधिकृत विक्री होत असलेली वाळू सामान्य गोरगरीब विकत घेऊ शकत नाही रमाई घरकुल १,३८००० एकुण मंजुर रक्कम आहे

# जिल्हा परिषद शाळा, गटशिक्षणाधिकारी कार्यालय,व शिक्षणाधिकारी कार्यालय यांच्या मधील होणारा पत्रव्यवहार इलेक्ट्रॉनिक स्वरुपात करावा - अविनाश पाठक

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हा परिषद अंतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, केंद्रीय प्राथमिक शाळा, जि. प. माध्यमिक शाळा,गटशिक्षणाधिकारी कार्यालय व शिक्षणाधिकारी (प्रा.)कार्यालय यांच्या मध्ये होणारा पत्रव्यवहार इलेक्ट्रॉनिक स्वरूपात करण्यात यावा असं आवाहन बीड जिल्हा परिषदेचे मुख्यकार्यकारी अधिकारी (भा.प्र.से.) अविनाश पाठक यांनी केले आहे.

बीड जिल्हा परिषद अंतर्गत २४१७ जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,१६४ केंद्रीय शाळा,५९ जिल्हा परिषद माध्यमिक शाळा अशा एकूण २४७६ शाळा आहेत,या शाळेवर नियंत्रण ठेवण्यासाठी केंद्रप्रमुख,५४ विस्तार अधिकारी,११ गटशिक्षणाधिकारी व ३ शिक्षणाधिकारी(प्रा.)(मा.)(यो)जिल्ह्यात कार्यरत आहेत.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा यांचा पत्र व्यवहार केंद्रीय प्राथमिक शाळेला करतात व तेथून हा पत्र व्यवहार गटशिक्षणाधिकारी कार्यालयाला होतो, हा पत्र व्यवहार करण्यासाठी बऱ्याच वेळा कार्यालयीन कर्मचारी अथवा परिचर उपलब्ध नसल्यामुळे कार्यरत असणारे शिक्षक या पत्रव्यवहारासाठी मुख्यालय सोडण्याची शक्यता नाकारता येत नाही .शिक्षकांनी अशा पत्रव्यवहारासाठी मुख्यालय सोडल्यास विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अधिकारावर परिणाम होतो व त्यांचे शैक्षणिक नुकसान होते .काही वेळा काही वेळा अशी कारणे दाखवून विनाकारण मुख्यालय सोडन्याची शक्यता सुद्धा नाकारता येत नाही.



उपोदघातामध्ये नमूद केलेल्या बाबी टाळण्यासाठी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, जिल्हा परिषद माध्यमिक शाळा, गटशिक्षणाधिकारी व शिक्षणाधिकारी यांच्यामधील सर्व पत्र व्यवहार इलेक्ट्रॉनिक माध्यमातून केल्यास केल्यास तो सोईस्कर होईल व मनुष्य तासांचा अपव्यय होणार नाही. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही म्हणून सदर सर्व पत्र व्यवहार इलेक्ट्रॉनिक माध्यमातून करण्याचे निर्देशित करण्यात येते.

हा पत्र व्यवहार करताना होणारी कार्यपद्धती ही सर्वांसाठी सारखी असावी म्हणून खालील प्रमाणे निर्देश देण्यात येतात. राज्य शासनाच्या ग्रामविकास विभागामार्फत ई-ऑफिस ही प्रणाली राबविण्याची कार्यवाही सुरू आहे. सदर कार्यवाहीसाठी ई-मेल आयडी तयार करणे, सदर ई-मेल आयडी शासनाच्या डोमेनवर तयार करणे व त्याची अंमलबजावणी करणे ही प्राथमिक जबाबदारी आहे. सदर कार्यवाही करण्यासाठी व शाळा स्तरापर्यंत ही कार्यवाही पोहोचण्यासाठी पुढील सहा महिन्याचा कालावधी ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पुण्याच्या हिंजवडीतील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी पालकमंत्री अजित 'दादां'चा प्लॅन



**मुबई । प्रतिनिधी**

पुण्यातील जागतिक दर्जाचे आयटी हब (खढ) अशी ओळख असणाऱ्या 'राजीव गांधी माहिती तंत्रज्ञान उद्यान' परिसरातील वाहतूक कोंडीची समस्या दूर करण्यासह या परिसरात नवीन उद्योग येण्यासाठी आवश्यक उपाययोजना तातडीने कराव्यात. या परिसरातील उद्योग, कर्मचारी आणि स्थानिक रहिवाशांच्या सोयीच्या दृष्टीने परिसरातील रस्त्यांचे रुंदीकरण, उड्डाणपूल, घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प यासारख्या पायाभूत सुविधा गतीने पूर्ण कराव्यात, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार (-क्षळीं झरुरी) यांनी आज संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांना मंत्रालयात आयोजित बैठकीत दिले. पुण्याच्या (झींपश) हिंजवडीतील वाहतूक कोंडी ही मोठी समस्या बनली आहे. त्या पार्श्वभूमीवर लवकरच विभागीय प्रशासकीय अधिकाऱ्यांना बैठक घेण्याच्या सूचनाही पालकमंत्री अजित पवार यांनी केल्या.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मंत्रालयातील त्यांच्या समिती कक्षात आज हिंजवडी औद्योगिक संघटनेच्या मागण्यांबाबत बैठक घेतली. या बैठकीस वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी. गुप्ता, उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव आशीष शर्मा, उद्योग विभागाचे प्रधान सचिव हर्षदीप कांबळे, नगरविकास विभागाचे प्रधान सचिव असीमकुमार गुप्ता, पुणे महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणाचे आयुक्त व मुख्य कार्यकारी अधिकारी राहूल महिवाल यांसह सर्वच प्रमुख अधिकारी उपस्थित होते. यावेळी, बैठकीत हिंजडीतील वाहतूक कोंडीवर चर्चा झाली. काही दिवसांपूर्वी हिंजवडीतील वाहतूक कोंडीमुळेही काही कंपन्या पुण्यातून बाहेर गेल्याची माहिती पुढे आली होती. त्याच दृष्टीने आता अजित पवार यांनी वाहतूक कोंडीसंदर्भाने बैठकीत महत्त्वाच्या सूचना केल्या.

या बैठकीत बोलताना अजित पवार म्हणाले की, पुण्याच्या विविध भागांतून उद्योग, नोकरीनिमित्त हिंजवडी आयटी परिसरात येणाऱ्या वाहनांची संख्या मोठी आहे. त्या तुलनेत याठिकाणचे रस्ते अरुंद आहेत, त्यामुळे नागरिकांना वाहतूक कोंडीच्या समस्येला तोंड द्यावे लागत आहे. वाहतूक कोंडीची समस्या दूर करण्यासाठी या भागातील रस्ते रुंद करावेत, सर्वच रस्त्यांवर सहा मार्गिका ठेवाव्यात, आवश्यक ठिकाणी उड्डाणपूल उभारावेत, सेवारस्त्यांची रुंदी वाढवावी, उड्डाणपुलांच्या ठिकाणी असलेल्या केबल्ससाठी भूमिगत व्यवस्था उभारावी. अनधिकृत केबल्स काढून टाकाव्यात. रस्त्यालगत उभारण्यात आलेले अनधिकृत जाहिरात फलक काढून टाकून या परिसराचे सौंदर्यीकरण पूर्ववत करण्यात यावे. रस्त्यांवरील खड्डे भरावेत, दुभाजक आणि पदपथांच्या दुरुस्तीची कामेही तात्काळ मार्गी लावावीत. एमआयडीसी परिसराबाहेरील काही ठिकाणी पावसाचे पाणी साचल्यामुळे वाहतूक कोंडी होत आहे. त्यामुळे या पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था उभारावी, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले.

मागील काही वर्षांचा विचार करता हिंजवडी आयटी परिसरात वाहनांची एव्हढी रहदारी नव्हती. या परिसरात येणाऱ्या राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कंपन्या, तसेच परिसरात उभे राहणाऱ्या पूरक उद्योग-व्यवसायामुळे या भागात रहिवाशी आणि वाहनांची संख्या वाढत आहे. हिंजवडी परिसराचा वेगाने विकास करण्यासाठी या परिसरात पायाभूत सुविधांची गतीने उभारणी करणे गरजेचे आहे. त्यामुळे संबंधित सर्व यंत्रणांच्या प्रमुखांनी विभागीय आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली येत्या शुक्रवारी आणि शनिवारी या भागाची पाहणी करून आवश्यक उपाययोजना करण्याची कार्यवाही करावी, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी उपस्थित वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिले.

उपमुख्यमंत्री अजित पवार बैठकीत मार्गदर्शन करताना म्हणाले की, हिंजवडी, माण, मारुंजी गावच्या हद्दीत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या माध्यमातून तीन टप्प्यांमध्ये राजीव गांधी माहिती तंत्रज्ञान उद्यान विकसित करण्यात आले आहे. जागतिक पातळीवर त्याची आयटी हब म्हणून वेगळी ओळख निर्माण झाली आहे. येथील कंपन्यांना उद्योग सुलभ वातावरण देण्यास राज्य शासनाने प्राधान्य दिले आहे. त्यामुळे पीएमआरडीए, पीसीएमसी, एमआयडीसी, पीडब्ल्यूडी आदी शासकीय यंत्रणांनी उद्योजकांना भेडसावणाऱ्या अडचणींचे समन्वयाने आणि तातडीने निराकरण करावे.

# भिंत कोसळून ५ कामगार दबले; २ ठार

**पुणे। प्रतिनिधी**

डिंग्रजवाडी (ता. शिरूर) येथील आयटीडब्ल्यू कंपनीसमोर असलेली १५ फूट उंचीची भिंत कोसळून भिंतीशेजारी उभ्या असलेल्या एका कामगाराचा जागीच, तर दुसर्‍याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. या दुर्घटनेत आणखी तीन जण जखमी झाल्याची प्राथमिक मिळाली असून, तेथे उभ्या



असलेल्या १ चारचाकी, १ बस, ९ दुचाकी व २ सायकलींचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. मृत्युमुखी पडलेल्यांची नावे राजीव कुमार व मंजित कुमार अशी असून, बंडू विधाटे, विजय गायकवाड आणि सतीश कानगुडे हे जखमी झाले आहेत. ही दुर्घटना बुधवारी (दि. १९) सकाळी साडेआठच्या सुमारास घडली.काही कामगार दुचाकींजवळ असताना अचानकपणे कंपनीसमोरील सुरक्षा भिंत कोसळली. पाच कामगार भिंतीखाली दबले गेले. काही कामगारांनी त्यांना बाहेर काढले. दरम्यान घटनेची माहिती मिळताच पोलिस उपनिरीक्षक महेश डोंगरे, पोलिस हवालदार आत्माराम तळोले, प्रतिक जगताप आदींनी घटनास्थळी धाव घेत जखमींना रुग्णालयात हलवले. परंतु उपचारापूर्वी राजीव कुमार यांचा मृत्यू झाला, तर उपचारादरम्यान मंजीत कुमार याचा मृत्यू झाला. या दुर्घटनेत ९ दुचाकी गाड्या, दोन सायकली व १ बोलेरो (एमएच १२ युएम ३७९३) व १ एक टेम्पो ट्रॅव्हलर (एमएच १४ सीडब्ल्यू ४४४०) यांचे नुकसान झाले.डिंग्रजवाडी (ता. शिरुर) येथील आयटीडब्ल्यू प्रायवेट लिमिटेड कंपनीमध्ये बुधवारी सकाळी साडेआठ वाजण्याच्या सुमारास कामगार कामावर आलेले होते, तर काही कामगार कंपनीत कामासाठी आयोजित मुलाखतीसाठी आलेले होते. कामगारांनी त्यांच्या दुचाकी तसेच कामगारांची वाहतूक करणारी बस व कार कंपनीसमोरील मोकळ्या जागेत लावलेल्या होत्या.

# डिंभे धरणात मोठ्या प्रमाणावर गाळ; साठवणक्षमतेवर परिणाम

**मंचर । प्रतिनिधी**

डिंभे धरणाच्या(हुतात्मा बाबू गेनू सागर) जलाशयात मोठ्या प्रमाणात गाळ साठला आहे. गाळ काढल्यास धरणातील पाणीसाठ्यात वाढ होऊ शकते. त्यामुळे शासनाने गाळ काढण्याची परवानगी द्यावी, अशी मागणी शेतकरी व वीटभट्टीच्या मालकांनी केली आहे.



डिंभे धरणात सध्या ०.३४ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. धरणपात्र कोरडे पडले आहे. धरणाचे बांधकाम होऊन ४९ वर्षे झाली आहेत. तेव्हापासून धरणात गाळ साठत आहे. यामुळे धरणाची पाणी साठवणक्षमता कमी झाली आहे. या धरणातून पुणे जिल्ह्यातील आंबेगाव, जुन्नर, शिरूर तसेच नगर जिल्ह्यातील पारनेर, श्रीगोंदा, कर्जत, जामखेड व सोलापूर जिल्ह्यातील करमाळा तालुक्याला पाणीपुरवठा केला जातो. या धरणातील पाणीसाठ्यावर पुणे, नगर व सोलापूर जिल्ह्यातील शेती अवलंबून आहे.

पावसाळ्यात या परिसरात मोठ्या प्रमाणावर पाऊस होतो. त्यामुळे डोंगर उतारावरून पाण्याबरोबर मातीही वाहून येत धरणात साठते. यामुळे धरणात मोठ्या प्रमाणावर गाळ साठला आहे. त्याचा परिणाम धरणातील पाणीसाठ्यावर झाला आहे. यासाठी धरणातील गाळ काढणे गरजेचे झाले आहे. या भागातील शेतकरी व वीट व्यावसायिकांना गाळ काढण्यास परवानगी दिल्यास गाळाचा उपसा होऊन पाणीसाठ्यात वाढ होणार आहे. त्यामुळे शासनाने कोरड्या पडलेल्या धरणातील गाळ काढण्यास परवानगी देण्याची मागणी शेतकरी करीत आहेत.

# अजित पवारांच्या काटेवाडीतून शरद पवारांचा इशारा; मोदींना म्हणाले, बारामतीचा चमत्कार बघितला ना

**पुणे । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर शरद पवार यांचे बारामती दौरे वाढले असून आगामी विधानसभा निवडणुकांसाठीही त्यांनी रणशिंग फुंकल्याचं दिसून येत आहे. काही दिवसांपूर्वी बारामतीमधील (इरीरारींळ) व्यापाऱ्यांच्या मेळाव्यात उपस्थिती दर्शवत बारामतीच्या विकासासाठी वेळ पडल्यास पंतप्रधान नरेंद्र मोदींचीही भेट घ्यायला मागेपुढे पाहणार नसल्याचं शरद पवार (डहरीरव झरुरी) यांनी म्हटलं होतं. त्यानंतर, वडगाव निंबाळकर गाव दौऱ्यातून नाव न घेता अजित पवार यांच्या दमदाटीवरुनही टोला लगावला होता. आता, शरद पवारांचं जन्मगाव असलेल्या



काटेवाडीतून त्यांनी थेट पंतप्रधान मोदींना लक्ष्य केले.

शरद पवार यांनी नुकतेच झालेल्या लोकसभा निवडणुकांवर भाष्य करताना काटेवाडीकर नेहमीच माझ्या पाठिशी राहिल्याचं म्हटलं. ही निवडणूक साधी सोपी नव्हती, यापूर्वी मी निवडणुकीला जास्त येत नव्हतो. एक-दोनवेळा मी यायचो आणि निवडणूक तुमच्या हाती देऊन मी महाराष्ट्रभर फिरायचो. मात्र, यंदाच्या निवडणुकीत अधिक लक्ष द्यावं लागलं. पण, येथील लोकं माझ्या पाठिशी आहेत, याची मला खात्री होती, असे म्हणत येथील शालेय शिक्षणपासूनची सुरुवातही पवारांनी सांगितली.

आजचा दिवस माझ्या लक्षात राहणारा दिवस आहे, कारण माझं चौथी पर्यंतचं शिक्षण इथे झालं आहे, आम्हाला वाघमारे नावाचे मास्टर होते. शनिवार आणि रविवारी सुट्टीचा दिवस होता तेव्हा, आमची आई गुरे घेऊन पाठवायची, अशी बालपणीची आठवण शरद पवारांनी सांगितली. सत्तेचा वापर लोकांच्या आयुष्यात चांगला बदल करायचा असतो ही शिकवण मला यशवंतराव चव्हाण यांनी दिली, त्याच वाटेने मी जात आहे. आजपर्यंतच्या सगळ्या निवडणुकांमध्ये मला यश आलं. कारण, नारळ इथे फोडला होता, असे म्हणत काटेवाडीकरांची मने जिंकली.

कन्हेरीत नारळ फोडल्यावर यश मिळते हा आमचा सगळ्यांचा अनुभव आहे, देशात कुठंही गेलो तरी लोकं विचारायचे बारामतीत काय होईल?. माझं मन मला सांगायचं की बारामतीकर माझी साथ सोडणार नाहीत ते खरं झालं. जिथं लोकं सांगत होते मतं पडणार नाहीत, त्या बुथवर चांगली मते पडली. मोदी इथे आले आणि एकच विषय होता शरद पवार. देशाचा पंतप्रधान माझं नाव घेतो काय साधी सुधी गोष्ट आहे का? काटेवाडीकरांचा चमत्कार त्यांना कळालं, असे म्हणत शरद पवारांनी मोदींवर हल्लाबोल केला. तसेच, मोदींनी टीका केली की मतं आपल्याकडे येतात. मोदींनी अजून इथं याव, असेही पवार यांनी म्हटलं.

येथील जनता गेल्या ५७ वर्षांपासून माझ्या पाठिशी असल्याचं त्यांनी म्हटलं. लोकसभा निवडणुकीत येथील जनता आपल्या पाठिशी राहिली. गेल्या ५७ वर्षांपासून आपण सर्वजण माझ्या पाठिशी आहात, असेही पवार यांनी म्हटले. तसेच,

# भाजी विक्रेत्या महिलेस कमांडोंकडून मारहाण; विविध राजकीय पक्षांकडून घटनेचा निषेध

पिंपरी । प्रतिनिधी

दापोडी येथे अतिक्रमण विरोधी कारवाई करताना एका भाजी विक्रेत्या महिलेस महापालिकेच्या पथकातील एमएसएफ कमांडोंनी मारहाण केली. त्या घटनेचा शहरातील विविध सामाजिक संघटना, संस्था आणि राजकीय पक्षांनी तीव्र शब्दात निषेध केला आहे.



महापालिकेच्या क्षेत्रीय कार्यालयाच्या पथकाकडून आपल्या हद्दीतील अतिक्रमण व अनधिकृत बांधकामांवर कारवाई केली जाते. दापोडी परिसरातील रस्त्यावरील अतिक्रमण हटविण्याचे काम शुक्रवारी (दि.१४) ह क्षेत्रीय कार्यालयाचे पथक करीत होते. भाजी विक्री करणार्या रेश्मा श्रावण कांबळे या महिलेस पथकातील एमएसएफच्या कंमाडोंनी मारहाण केली. हातगाडीवरील भाजीपाला रस्त्यावर फेकून दिला. या अमानवी घटनेचा विविध संघटना, संस्था आणि राजकीय पक्षांकडून तीव्र शब्दात निषेध करण्यात आला आहे. त्या भाजीपाला व हातगाडीचे नुकसान झाले.

महापालिकेने केलेली कारवाई निषेधार्ह आहे. असे असताना महापालिकेने संबंधित भाजी विक्रेत्या महिला आणि तिच्या दोन अल्पवयीन मुलांवर भोसरी पोलिस ठाण्यात खोटा गुन्हा नोंदविला आहे. कारवाईचा निषेध करण्यासाठी तसेच, गुन्हा मागे घ्यावा, मारहाण करणार्या कमांडोंवर गुन्हा दाखल करावा, अशा मागणीचे निवेदन राजकीय पक्ष, सामाजिक संघटना व भाजीपाला व्यापारी कृती समितीच्या शिष्टमंडळाकडून महापालिकेचे उपायुक्त मनोज लोणकर यांना मंगळवारी (दि.१८) देण्यात आले. या वेळी माजी नगरसेविका चंद्रकांता सोनकांबळे, उषा काटे तसेच, सिकंदर सूर्यवंशी, आप्पा गायकवाड, दीपक सावळे, अजय ठोंबरे, अनिल गजभिय, सुरेश बोर्डे, रवींद्र कांबळे, नंदू कांबळे, ओमपाल सोनिया, मेहबूब शेख, दीपक कांबळे, सामाजिक कार्यकर्ते व भाजी विक्रेते उपस्थित होते. यासंदर्भात भोसरी पोलिस ठाण्यातही निवेदन देण्यात आले.

पथकातील महिलांवर फौजदारी गुन्हा दाखल करा

भाजी विक्रेत्या महिलेला अमानुषपणे मारहाण करणार्या भरारी पथकातील कर्मचार्यांवर फौजदारी गुन्हा दाखल करावा. भ्रष्ट अधिकारी व पुढार्यांच्या ईशार्यावर कारवाई करण्याचा स्टंट करतात. धनदांडग्यांचे व्यावसायिक अतिक्रमणे सोयीस्करपणे दुर्लक्षित करून पोटाची खळगी भरण्यासाठी हातगाडी व पथारी लावून चरितार्थ चालवणार्या गोरगरिबांवर कारवाई करून त्यांच्या मालाची नासाडी करतात. प्रशासकीय राजवटीत शहरात पार्किंगची व वाहतुकीची गंभीर समस्या आहे.

# आसाम सेवा हक्क आयोगाने जाणून घेतली महाराष्ट्रातील कार्यप्रणालीची माहिती

**पुणे । प्रतिनिधी**

आसाम राज्याच्या सामान्य प्रशासन विभागाच्या सचिव श्रीमती मोनिका बोर्गोहेन आणि आसाम राज्य सेवा हक्क आयोगाच्या उपसचिव श्रीमती मिताली लाहकार यांनी महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगाच्या पुणे विभागीय कार्यालयास भेट देऊन राज्य आयोगाची कार्यपद्धती, पुरविण्यात येणाऱ्या सेवा आदी माहिती जाणून घेतली.

पुणे मनपा ढोले रोड क्षेत्रीय इमारतीतील आयोगाच्या कार्यालयास भेटीप्रसंगी राज्य लोकसेवा हक्क आयोगाचे आयुक्त दिलीप शिंदे, उपसचिव अनुराधा खानविलकर, कक्ष अधिकारी रंजना गवारी, शिल्पा पुरोहित आदी उपस्थित होते.राज्य लोकसेवा हक्क आयोगाचे आयुक्त श्री. शिंदे यांनी यावेळी राज्य आयोगाची आणि पुणे विभागाच्या कामकाजाची माहिती दिली. अधिनियमाद्वारे अधिसूचित केलेल्या सेवा, सेवा न मिळाल्यास करावयाचे अपील यांची माहिती देऊन पुणे विभागात सेवांसाठी प्राप्त मागणी, पुरविण्यात आलेल्या सेवा, अपील व त्यावर झालेली कार्यवाही याची माहिती दिली. आपले सरकार पोर्टलच्या माध्यमातून सेवांसाठी अर्ज करण्यात येत असल्याने पारदर्शकता असल्याचे त्यांनी सांगितले.आपले सरकार सेवा केंद्र, संग्राम केंद्र आणि सेतू केंद्रे यांच्या रचनेबद्दल माहिती देऊन पुरविण्यात आलेल्या सेवांचे प्रमाण ९० टक्क्यांच्या वर असून उर्वरित सेवांच्या निर्गतीची कार्यवाही सुरू असल्याचे सांगितले.आसामच्या सेवा हक्क आयोगाने बऱ्याच बाबीमध्ये महाराष्ट्राच्या आयोगाचे अनुकरण केले असून या भेटीमुळे अजून त्याचा लाभ आसाम राज्यासाठी होईल असे श्रीमती बोर्गोहेन म्हणाल्या.

# राज्यातील प्रत्येक कारागृहातून बुद्धिबळ खेळणारे संघ तयार करणार-अमिताभ गुप्ता










## येरवडा कारागृहात आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ परिषदेचे आयोजन

**पुणे । प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ संघटना (फिडे) व इंडीयन ऑईल यांच्या संयुक्त विद्यमाने येरवडा मध्यवर्ती कारागृह येथे द्वितीय 'चेस फॉर फ्रीडम' या आंतरराष्ट्रीय परिषदेचे १९ ते २१ जून या कालावधीत आयोजन करण्यात आलेले आहे. राज्यातील प्रत्येक कारागृहातून बुद्धिबळ खेळणारे संघ तयार करण्यासह महिला बंदिवानांचा सहभाग वाढविण्यावर भर देण्यात येईल, असे प्रतिपादन स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी कारागृह विभागाचे अपर पोलीस महासंचालक अमिताभ गुप्ता यांनी केले.

या प्रसंगी कारागृह विभागाचे विशेष पोलीस महानिरीक्षक डॉ.जालिंदर सुपेकर, कारागृह उपमहानिरीक्षक स्वाती साठे, येरवडा कारागृहाचे अधीक्षक सुनिल ढमाळ, इंडियन ऑईलच्या संचालक (मानव संसाधन) रश्मी गोविल, फिडेच्या सामाजिक आयोगाचे अध्यक्ष आंद्रे वोगेटलिन, अखिल भारतीय बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष नितीन नारंग व फिडे प्राधिकृत परदेशी प्रतिनिधींचे शिष्टमंडळ उपस्थित होते.

'परिवर्तन प्रिझन टू प्राईड-नई दिशा' या उपक्रमांतर्गत येरवडा कारागृहाच्या बंदिवानांच्या संघाने आंतरराष्ट्रीय ऑनलाईन बुद्धिबळ स्पर्धेत सुवर्ण पदक मिळविल्याचा आनंद व्यक्त करुन श्री.गुप्ता म्हणाले, कारागृहातील बंदी आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभाग घेण्यासाठी पुढे येत आहेत. सुवर्णपदक प्राप्त बंदीवानांना शिक्षेत विशेष माफी देवून प्रोत्साहन देण्यात आले आहे.

मागील वर्षी एक प्रयत्न म्हणून येरवडा कारागृहात बंदिवानांसाठी बुद्धिबळ खेळास सुरूवात केल्यानंतर एका वर्षातच आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. बंदिवानांनी चांगली तयारी करून मागच्या वर्षी सुवर्णपदक मिळविलेल. बाहेर सर्व सुविधा असणाऱ्या खेळाडूंना जे जमणार नाही ते या कारागृहातील बंदीवान खेळाडूंनी करून दाखविले. सध्या येरवडा कारागृहात महिला व पुरूष असे २०० बंदी बुद्धिबळ शिकत आहेत, असे त्यांनी सांगितले.

यावेळी श्रीमती गोविल म्हणाल्या, बुद्धिबळामुळे बुद्धीला चांगली चालना मिळते व परिस्थितीला यशस्वीपणे सामोरे जाण्याचे कौशल्य निर्माण होते. त्यामुळे बंदिवानांना भविष्यात याचा लाभ होईल.

विविध देशांतील कारागृहांतील बंदिवानांना बुद्धिबळ या खेळामध्ये प्रशिक्षण देवून विविध देशांतील तुरुंगातील बंदीवानांची स्पर्धा आयोजित करणे हा या परिषदेचा मुख्य उद्देश आहे. या माध्यमातून बंदीवानांमध्ये तुरूंगातून सुटका झाल्यानंतर समाजामध्ये गेल्यानंतर आपल्यातही काही कौशल्ये आहेत ज्याआधारे आपण समाजामध्ये आत्मसन्मानाने जगू शकू असा आत्मविश्वासही निर्माण होऊ शकणार आहे, अशी माहिती उद्घाटनप्रसंगी देण्यात आली.